

सर्वांचा उद्धार होईल.'' बाबांनी मग चार साधने सोप्या भाषेत सांगितली; ती येणेप्रमाणे :- १) नित्यानित्यवस्तूविवेक (२) वैराग्य (३) शमदमादि षट्क आणि (४) मुमुक्षुता. या चार साधनांनी जो साधक युक्त आहे असा शिष्य आत्मबोधासाठी अधिकारी होतो. प. पू. दासगणू महाराजांनी हा उपदेश 'अर्वाचीन भक्त व संतलीलामृत'मध्ये त्यांच्या ओघवत्या भाषेत ओवीबद्ध केला आहे. (श्री संतकथामृत, अध्याय ५७वा) बाबा सांगतात, या साधनचतुष्टयांनी जेव्हा जेव्हा शिष्य संपन्न होतो तेव्हाच त्याच्या उद्धाराकरिता ब्रह्मज्ञानाचा उपदेश करावा. नित्यानित्य विवेकाची व्याख्या सांगताना म्हणतात, **''पाहिजे भावना मनींची। की ब्रह्म सत्य जग मिथ्या ॥३१॥''** पण, आपला नित्यानित्य विवेक दृढ झाला आहे, असे सांगणारे दांभिक खूप असतात. लोकांत मान मिळावा, या हेतूने श्रद्धा नसताना पंढरीचा वारकरीही बनतात. ग्रंथांचे भाराभार वाचन करून आपल्या पांडित्याची शेखी मिरवणारे पढित पंडित वादविवादात पटाईत असतात. परंतु, अहंकारापायी त्यांचे अंत:करण अशुद्ध असते. याशिवाय आपली थोरवी मिरवणारे आणि परनिंदा करणारे ब्रह्मज्ञानाला अयोग्य होत. 'आत्मरूप' नित्य आहे, हा निश्चय आणि त्याव्यतिरिक्त सर्व अनित्य, असा जो मनाचा निश्चय त्याचे नाव 'विवेक'. हे आत्मानात्म विवेकाचे प्रमुख लक्षण होय ! हे पहिले साधन.

दुसरे साधन आहे 'वैराग्य'. ब्रह्मज्ञान होण्यासाठी महत्त्वाचे तत्त्व म्हणजे 'वैराग्य' होय ! या लोकांतले, त्याचप्रमाणे परलोकांतले भोग भोगण्यासंबंधाने इच्छारहित असणे, त्याचे नाव 'वैराग्य'. हे वैराग्याचे लक्षण होय ! श्री साईबाबा म्हणतात, **''इहपरलोकींच्या विषयाची। आशा न ज्यासी उरली साची। तीचि मूर्ति वैराग्याची ॥''** ५७:३८ ॥ विषयभोग अनित्य आहेत, निरर्थक आहेत, अंती क्लेशदायक आहेत, हे सत्य अनुभवाने कळले की मग सत्यज्ञान होते. विषयभोगाची आसक्ती, प्रीति नष्ट होऊन वैराग्य उपजते.

'शमदमादि षट्क' हे तिसरे साधन आहे. चित्तशुद्धीची पूर्वतयारी म्हणजे 'शमदमादि षट्क'. दुर्गुणांचा निरास आणि सद्गुणांची जोपासना आवश्यक ठरते. व्यवहारात 'विवेक' या शब्दाला वेगळा अर्थ आहे. अध्यात्मात 'विवेक'ला विशेष अर्थ आहे. ''देहापासून आपण वेगळे आहोत'', हे ओळखणे व ''ब्रह्मच नित्य, अन्य सर्व अनित्य'', असे जाणणे याला 'नित्यानित्यवस्तूविवेक', असे म्हणतात. राग-द्वेषांचा क्षय होत नाही तोवर कर्मांतून दोष उद्भवणार. वर्णाश्रमानुसार धर्माचरण केल्याने ईशकृपेने वैराग्यादि चार साधने सिद्ध होतील. त्यासाठी शमदमादि षट्संपत्ती सांगितल्या आहेत; त्या अशा :-

**१) शम** - सर्व वासनांचा त्याग. स्वलक्ष्याच्या ठिकाणी मनाच्या एकाग्रतेमुळे जी सुस्थिर स्थिती असते - हे शमाचे लक्षण आहे. तीव्र वैराग्य (पूर्वांग) आणि दमादि (उत्तरांग) ही दोन्ही अंगे असतील तरच 'शम' साधतो.

**२) दम** - शब्दादि बाह्य विषयांपासून इंद्रियांचा निग्रह. अनेक प्रकारच्या वृत्तींचा निरोध करून बाह्य इंद्रियांचा विशेष निग्रह करणे म्हणजे 'दम' - हे मनाच्या शांतीचे साधन आहे. सात्त्विक भाव प्राप्त होऊन मन प्रसन्न राहते.

**३) उपरति** - सर्व प्रपंचापासून निवृत्ती. कर्माचा उपरम (समाप्त होणे) करविते ती 'उपरति' आणि या 'उपरति' शब्दाने संन्यास सांगितला जातो.

**४) तितिक्षा** - शितोष्णादि (सुखदु:खादि) जे द्वंद्व धर्म ते सहन करण्याची योग्यता. प्रतिकार न करता आणि चिंता-विलाप न करता सर्व दु:खे सहन करणे म्हणजे 'तितिक्षा'. मुमुक्षूचे हे संरक्षक कवच आहे. या कवचामुळे धीर पुरुष सर्व विघ्नांना तृणवत मानून मायेवर विजय मिळवितात.

**५) श्रध्दा** - ब्रह्मनिष्ठ सद्गुरुच्या, त्याचप्रमाणे वेदांत शास्त्रांतल्या वाक्यांच्या ठिकाणी भक्ती. गुरुची आणि वेदांताची वचने सत्य आहेत, अशी जी निश्चयात्मक बुद्धी ती 'श्रद्धा' होय ! हे मुक्ती प्राप्त करण्याचे साधन आहे.

**६) समाधान** - सच्चित्स्वरूप जाणून घेतेवेळी केलेली चित्ताची एकाग्रता. श्रुतीने सांगितलेला अर्थ समजून

घेण्याकरता ज्ञेय वस्तूच्या, म्हणजे ब्रह्माच्या ठिकाणी चित्ताला नीट प्रकारे ठेवणे याला 'समाधान' असे म्हणतात. साध्याच्या ठिकाणी चित्ताची एकाग्रता हेच पुरुषार्थ-सिद्धीचे निश्चित कारण आहे. अन्य मार्गाने पुरुषार्थ साधत नाही. म्हणून मुमुक्षूंनी सर्वदा समाधानाने युक्त असावे.

श्री सद्गुरु साईबाबांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत मोजक्या शब्दांत आणि सोप्या भाषेत षट्क समजावले आहे. **''मनोनिग्रह विषयांठायी । याचे नांव शम पाही ।।''** तर दम म्हणजे, **''विषयीं गेलिया वासना । बलात्कारें आवरिती मना । त्या आवरण्यामती नाना । दम ऐसे म्हणावे ।।४१।। निजप्रारब्धेंकरून । प्राप्त झालिया दुःख जाण । तें आक्रोशावांचूनि सहन । करणें ती तितिक्षा ।।४२।। मायाजाळी न गुंते चित्त । कनक कांता सुत आप्त । हे मानणें मिथ्याभूता याचे नाव उपरती ।।४३।। विश्वासयुक्त असणें मन । याचेंचि नांव श्रध्दा जाण ।।४४।।''** आणि समाधान म्हणजे, **''समान सुखदुःखे मानी सारीं । तळमळ मुळीं न अंतरी । स्थिर चित्त शैलापरी । याचे नांव समाधान ।।४५।।'' (अ. ५७, भक्तलीलामृत)** श्री सद्गुरु साईबाबांचा हा उपदेश फार मौलिक असा आहे. कारण चित्तशुद्धीची ही साधने - नित्यानित्यवस्तूविवेक, इहसूत्रात्रफलभोगविराग, शमदमादिषट्साधनसंपदा, आणि मुमुक्षूता आत्मसाक्षात्काराची पूर्वतयारी होय ! आत्मानुभव येण्यास प्रथम पूर्वसुकृताने ईशकृपा होऊन गुरुभेट व्हावी. मग श्री सद्गुरुंची अनुपम करुणापूर्ण कृपादृष्टी पडावयास हवी. सद्गुरूंनी उपदेशिलेल्या आत्मतत्त्वाचे श्रवण, मनन, चिंतन आणि अभ्यास चित्ताची एकाग्रता करून मुक्तीसाठी प्रयत्न करावा. त्यामुळे विवेकवैराग्य येऊन मनुष्य आत्मदर्शनास पात्र होतो.

मुमुक्षूता - संसारबंधनापासून मुक्त होण्याची जी तीव्र इच्छा तिचे नाव 'मुमुक्षूता', म्हणजे मोक्षेच्छा; हे साधन शेवटचे. सर्व साधनांमध्ये मुमुक्षूता (मुक्तीची इच्छा) हे मुख्य (मूळ) साधन आहे. तीव्र मुमुक्षू, नित्य अनेक प्रकारच्या तापत्रयांनी कंटाळून, त्रासून मन क्षुब्ध झाल्यामुळे सर्व संग्रह अनर्थकारक असे जाणून (पुरुष) तो संग्रह टाकून आणि मोक्षेच्छेने घरदार सोडतो. संन्यस्त राहून जिवंत असताना मुक्त होतो. (गुरुबोध)

श्री साईबाबा मुमुक्षू व मुमुक्षूता चांदोरकरांना (अ. ५७) समजावून सांगताना म्हणतात, ''अविनाशी शुद्ध चैतन्याशी एकरूप होणे म्हणजेच मोक्ष. त्या साध्याप्रत पोहचणे, हाच खरा पुरुषार्थ. पण ही मोक्षाची वाटचाल फार अवघड आहे. म्हणून, तुम्हास सुलभ युक्ती सांगतो.'' **''ही अध्यात्म विद्येची पायरी । तुम्हां अवघड चढण्या जरी । परी सुलभ युक्ति खरी । सांगतों मोक्षा जावया ।।'' ३३:११२ ।। ''मार्गें तुला आणि निमोणकरा ।.... (अ. ३१-३२ पहा) ज्या कथिलें ज्ञान भांडारा । तैसें वागूनि परमेश्वरा । शरण जावे अवघ्यांनी ।।'' ३३:११७ ।।** मुमुक्षूची सारभूत व्याख्या आणि लक्षणे सांगतात, **''मनीं मोक्षइच्छा बळकट । त्याव्यतिरिक्त मानी वीट । अपरोक्षज्ञानाची जो वाट । हुडकीतसे तो मुमुक्षु ।।'' ५७:४६ ।। ''मुमुक्षुपणाची पात्रता । अंगी असणे तत्त्वतां । याचे नाव मुमुक्षुता । निश्चयेकरूनि जाणावे ।।'' ५७:४७ ।।** मुमुक्षूची लक्षणे सांगताना म्हणतात, ''तुला पुरुष-स्त्रीनीति सांगितली, कर्मसिद्धांताचे मर्म सांगितले; आता मुमुक्षूता कशी जाणावी ते ऐक, **''जो बद्धस्थितीसी कंटाळला । जाणे सद्सद्विचाराला । म्हणे कधी भेटेल मला । देव तो मुमुक्षु ।। ३३.८१ ।। सत्संगाची करी आस । निःसार मानी जगतास । जो विटला प्रपंचास । तो मुमुक्षु जाणावा ।।८२ ।। देहप्रारब्धे जी स्थिती । प्राप्त झाली तयाप्रती । त्यांतचि मानी चित्तीं । समाधान मुमुक्षु ।।८३ ।। जयासी पाप करण्याचें । वाटतसे भय साचें । असत्य न बोले कदा वाचे । तो मुमुक्षु जाणावा ।।८४ ।। कृतकर्मांचा पश्चात्ताप । ज्यासी झाला असेल सत्य । तो जरी असला पतित । तरी मुमुक्षु जाणावा ।।८५ ।। दैवाविषयी ज्यासी आस्था । साधूंचे ठायी नम्रता । जो नीतीचा असे भोक्ता । तो मुमुक्षु जाणावा ।।८६ ।।''**

भगवान श्रीकृष्ण सांगतात, जिज्ञासू, हितार्थ, विव्हळ आणि ज्ञानी चौघे भक्त मला भजतात. त्यांच्या कामना मीच पुरवतो, फल देतो. परंतु, सर्वांत मला ज्ञानी भक्त फार प्रिय आहेत. श्री साईबाबा प्रापंचिकांच्या मनोकामना पूर्ण करून, मनोवांच्छित फल देऊन भक्तिमार्गाला लावीत. श्री साईबाबांच्या अवतारकार्याचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी भक्तांना त्यांच्या इष्ट दैवतांचे दर्शन दिले; तसेच सद्गुरु म्हणून चारी भक्तांना अधिकारानुसार मार्गदर्शन केलेले आढळते. लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे, बाबांचे सर्व भक्त आहेत; त्यांचा शिष्यपरिवार नाही. मात्र, त्यांचे लाखो भक्त त्यांना सद्गुरु मानतात.

## गीताध्याय ४, श्लोक ३४ आणि श्री साईबाबांचे विवरण व गूढार्थ

गीतेतील चौथा अध्याय 'ज्ञान-संन्यास-योग' याबाबत आहे. गीतेत आदर्श कर्म शुद्धप्रवृत्त असले पाहिजे, हे सांगताना ते निष्काम, निरहंकारी, स्वार्थरहित, स्वत:कडे कर्तृत्व न घेता केले पाहिजे, असे म्हटले आहे. हा कर्माचार संन्यासी व प्रापंचिक दोघांसाठी सारखाच आहे. दोघांचे कर्माचे स्वरूप भिन्न असले तरी कर्म आवश्यक आहे. गीतेत अखंड प्रवृत्तीपर कर्ममार्गाचा अगर सर्वकर्मविरोधी संन्यास मार्गाचा एकांगी आदेश दिलेला नाही. प्रवृत्तीपर कर्ममार्ग हा लौकिक मार्ग असून निवृत्ती मार्ग हा अक्षय मोक्षसुखप्रद आहे. गीतेत दोन्हींचा समन्वय सांगितला आहे. अंतिम ध्येय ईश्वरप्राप्ती व चित्ताची साम्यावस्था साधणे, हे असते. कर्मयोग त्याचे आवश्यक साधन आहे.

३४व्या श्लोकात म्हटले आहे की, तत्त्वदर्शी ज्ञाते पुरुष सद्गुरु तुला परमश्रेष्ठ ज्ञान सांगतील. आदर्श आचरणासाठी शुद्ध बुद्धी आणि अविचलित भावना हवी; तर आत्मज्ञानासाठी सद्गुरूंनी उपदेशिलेल्या आप्तवाक्यांवर पूर्ण श्रद्धा हवी. अशा दृढ श्रद्धेने मुमुक्षूस पुढील मार्ग उपलब्ध होतो.

चौथ्या अध्यायातील सूत्रात भगवंतांनी ज्ञान व योग यांचे एकत्व वर्णन केले आहे. आत्म्याचे नित्यत्व, आपले अवतार, पुनर्जन्म, गुरुमाहात्म्य, ज्ञान-अज्ञान, कर्म, संन्यास इत्यादी विषयांचे विवरण त्यात आढळते. श्री साईसच्चरितामधील अध्याय ३९ व ५० आणि प. पू. दासगणूंच्या चार अध्यायांतून बाबांनी दिलेली शिकवण, उपदेश, कर्मसिद्धान्त, पुनर्जन्म, अवताररहस्य, नीतिमूल्ये, प्रवृत्ती-निवृत्तीपर कर्मविचार यांचे सार गीतेच्या चौथ्या अध्यायात मिळते. श्रीकृष्णाचे मनोगत, अ. ४, श्लोक ३४चे विवरण करताना सांगितले आहे. श्रीकृष्ण भगवानांना अभिप्रेत असलेला अप्रगट अर्थ बाबांनी उलगडून दाखविला. हे एकात्मता असल्याशिवाय घडणार नाही.

श्री. नानासाहेब चांदोरकर बाबांचे अंतर्गत भक्त. एकदा द्वारकामाईत बाबांचे पादसंवाहन करताना मनात गीतेचे श्लोक म्हणत होते. तेव्हा श्री साईबाबांनी नानासाहेबांना विचारले, ''नाना, काय रे पुटपुटतोस ?'' मुंगीचेही हृदगत, शेकडो कोस दूर असणाऱ्या भक्तांचे मनोगत जाणणाऱ्या बाबांना काय ज्ञात नव्हते. परंतु, नानांवर कृपा करण्याच्या निमित्ताने भक्तांना त्यांच्या अभ्युदयासाठी विशेष बोध देण्याचे बाबांच्या मनात आले, म्हणाले, **''नाना काय रे पुटपुटसी मना । स्पष्ट रे कां ना वदसी मुखें ।।'' श्री साईसच्चरित ५०:४१ ।।** बाबांच्या आज्ञेनुसार चांदोरकरांनी गीतेचा श्लोक ३४ म्हणून दाखविला :

**''तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: ।।**

(अर्थ - आचार्यांकडे जाऊन त्यांना प्रणिपात करणे, प्रश्न करणे, त्यांची सेवा करणे; अशा रीतीने शरण जाऊन ते ज्ञान प्राप्त करून घे ! ज्ञानसंपन्न व अनुभवी आचार्य त्या ज्ञानाचा तुला उपदेश करतील : पू. मामासाहेब दांडेकर)

श्री साईबाबांनी अर्थ विचारून श्लोकाच्या अर्थाचे स्पष्टीकरण करण्यास सांगितले. नाना बहुश्रुत, संस्कृतचे अभ्यासक व गीताभाष्य पारंगत होते. त्यांनी अत्यंत विनयाने अन्वयार्थ, अर्थ आणि टीकाकारांचे भाष्य निवेदन केले. विचारल्यावर प्रत्येक पदाचा अर्थ सांगितला.

श्री साईबाबांनी पहिल्या दोन चरणांचा अर्थ मान्य केला. दुसऱ्या दोन चरणांवर अनेक प्रश्न विचारले. श्लोकाचा मतितार्थ कळतो का म्हणून पृच्छा केली. नानासाहेबांनी आपली असहाय्यता सांगून म्हटले की, हे अर्थ भाष्यकारांचे आहेत. त्यांपलीकडील अर्थाचा बोध मला होत नाही. नानासाहेबांना विचारलेल्या व्याकरणविषयक प्रश्नांची सखोलता व त्या अनुषंगाने विचारलेले सूचक प्रश्न ऐकून नानासाहेबसहित सर्व उपस्थित चकित झाले. श्री बाबांनी लिंग, विभक्ती व काळ यांवर विचारलेले प्रश्न अभूतपूर्व असेच होते. संस्कृतच्या गाढ्या अभ्यासकासच केवळ ते शक्य होते.

उपस्थित विद्वान भक्तजन एकाग्रतेने श्रवण करत ज्ञानामृत प्राशन करीत होते. दाभोलकर वर्णन करतात, **इतरही भक्तचकोरगण। साईमुखचंद्र अनुलक्षून । करावया अमृतकणसेवन । आ पसरूनि आस्थित ॥ श्री साईसच्चरित ३९:५३ ॥**

श्री साईबाबांनी ज्ञानाची पाणपोई उघडली होती. आध्यात्मिक ग्रंथ कसे वाचावेत हे ते सांगतात. म्हणतात, नाना, शब्दांची फोड करताना ग्रंथकर्त्याच्या मनात डोकावता आले पाहिजे. त्यासाठी तद्रूपता हवी. शुद्ध चित्त व शुद्ध बुद्धी हवी. तदनंतर परमेश्वराच्या कृपेने सद्गुरूंची भेट होते. ते ज्ञान प्रदान करतात. कारण, सद्गुरु साक्षात्कारी तत्त्वदर्शी असतात. साक्षात्कारी, अनुभवी संत-महात्मे-सत्पुरुष गूढार्थ सांगू शकतात. शब्दाचा सर्वसामान्य अर्थ न घेता त्यातील गर्भितार्थ जाणता आला पाहिजे. म्हणून सद्गुरु हवेत. **ऐसें म्हणून साई कृपाघन । भक्तचकोरचातकाकारण। वर्षले (जे) बोधामृतकण... (श्री साईसच्चरित ५०:५१)**

श्लोकाचे विश्लेषण करताना बाबांनी कोणाही भाष्यकाराच्या मताचे खंडन केले नाही. भाष्यकारांनी सांगितलेला अर्थ असत्य वा चुकीचा किंवा निरर्थक नाही, असे सांगून बाबांनी ३४व्या श्लोकाचा गुह्यार्थ व सद्गुरुची व्याख्या सांगितली. बाबांनी श्रीकृष्ण भगवानांना अभिप्रेत असलेला अर्थ सांगून श्रीकृष्णाचे मनोगत प्रगट केले. यासंदर्भात ज्ञानेश्वरीमधील (अ. १३) 'ज्ञानेश्वर महाराज व संतश्रोते' यांमधील संवाद फार बोलका आहे. 'अज्ञान' विषयाचे विवेचन लांबले तेव्हा श्रोत्यांची क्षमा मागताना श्री ज्ञानेश्वर म्हणतात, ''ही माझी व्यर्थ बडबड नव्हे; मी फक्त भगवंताचे मनोगत सांगत आहे.'' **''तैसे जी न बडबड । पदाची कोर न सांडीं । परि मूळध्वनींचिये वाढी । निमित्त जालों ॥'' १३:८५३ ॥** ही व्यर्थ बडबड नव्हे; कारण मी या पदाची अर्थमर्यादा सोडलेली नाही. मुळात ध्वनीत अपेक्षित केलेल्या अर्थाची उकल करण्याचे काम मी केले आहे. त्यावर श्रोत्यांनी केलेली प्रतिक्रिया विशेष बोलकी आहे. आणि हे श्रोते संत, अधिकारी पुरुष आहेत. ते म्हणतात, ''भगवंतांनीच तुला सांगितले आहे की, त्यांनी गुप्त ठेवलेला अभिप्राय स्पष्ट करून प्रगट कर म्हणून.'' **''तूतें श्रीमुरारी । म्हणितलें प्रगट करीं । जे अभिप्राय गव्हरीं । झांकिले आम्हीं ॥'' १३:८५५ ॥** श्री साईबाबांचे निरूपण तसेच आहे, **ते देवाचे मनोगत। दावित आहासी तूं मूर्त।**

श्री साईबाबांनी शब्दागणिक प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. प्रत्येक पदाचा अर्थ विचारला. त्यावरून बाबांची संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाची प्रचीती येते. नाना बहुश्रुत व अभ्यासू होते. त्यांनी परंपरागत अर्थानुसार पदांचे अर्थ सांगितले. बाबांनी विचारले, 'तद्विद्धि'मध्ये 'तत्' कशाला उद्देशून म्हटले आहे ? नानांनी उत्तर दिले, ज्ञानाला. 'प्रणिपात' म्हणजे काय ? 'पात' म्हणजे काय ? नाना : दोहोंचा अर्थ एकच - ''लोटांगण घालणे, पाया पडणे.'' बाबांचा प्रतिप्रश्न, मग व्यासांनी दोन अक्षरे (प्रति) का वापरली असतील ? तसेच 'परि' व 'प्रश्न' या दोहोंचा अर्थ ''प्रश्न विचारणे'', असा होतो; तरमग व्यासांनी 'परि' प्रत्यय का लावला ? प्रश्नांची सरबत्ती चालू होती.... 'सेवा' म्हणजे काय ? नानांनी तत्काळ उत्तर दिले, गुरुचे चरण दाबणे वगैरे विशेष कर्म वा कार्य करणे म्हणजे 'सेवा'. बाबा आता शब्दामागील अभिप्रेत अर्थ सांगताना म्हणतात, 'प्रणिपात'चा अर्थ ''पाया पडणे''; पण हा

झाला शब्दार्थ. त्यात अभिप्रेत आहे, साष्टांग दंडवत घालून सर्वश्रेष्ठ अशा सद्गुरूंना लीन-दीन होऊन, अनन्यभावाने शरण जाणे. आपले सर्वस्व, म्हणजे 'तन-मन-धन' गुरुचरणी अर्पण करणे.

तसेच, 'परिप्रश्नेन' म्हणजे गुरुच्या ज्ञानाची परीक्षा घेण्याकरिता प्रश्न विचारणे नव्हे, तर सत्यज्ञान, आत्मबोध होण्यासाठी गुरूंना नम्रतेने, आस्थापूर्वक, शरणागत भावाने प्रश्न विचारणे होय !

'सेवा' म्हणजे केवळ गुरूंचे पादसंवाहन नव्हे; हा रूढ अर्थ झाला. येथे आत्मज्ञान प्राप्त करावयाचे आहे, तेव्हा त्यातील गर्भितार्थ जाणून घ्यावयास हवा. त्याचा भावार्थ असा आहे की, आपला देह गुरुचरणी वाहणे. देह गुरुचा म्हटल्यावर देहभाव आपोआप विरतो. देह त्यांचाच आहे आणि त्यांच्या सेवेकरिता त्यांनाच अर्पण करीत आहोत, हा भाव 'सेवा' शब्दात अभिप्रेत आहे.

त्यानंतर श्री साईबाबांची खरी ज्ञानगंगा स्त्रवू लागली. भगवान श्रीकृष्णांचे अप्रगट मनोगत आता बाबा सांगू लागले, **"नाना तृतीय चरण । पुनश्च लक्षांत घेईं पूर्ण । 'ज्ञान' शब्दामागील जा । अवग्रह (आण) अर्थास ।।" श्री साईसच्चरित ३९:५४ ।।**

नाना, 'ज्ञानी आणि तत्त्वदर्शी' ज्ञानाचा उपदेश करतात, असे म्हणतोस; पण शास्त्रांनी (आत्मा) ज्ञान हे वाणीच्या व मनाच्या पलीकडले आहे, असे म्हटले आहे. ज्ञान शब्दापलीकडले, तो बोलाचा विषय नव्हे; मग त्याचा उपदेश कसा होऊ शकेल बरे ? ज्ञानी, तत्त्वदर्शी ज्ञानाचा उपदेश करतात, असे जे म्हणतोस त्याऐवजी 'अज्ञान' पद घे ! तुला यथार्थ बोध होईल. **ज्ञान नव्हे बोलाचा विषय । कैसें होईल तें उपदेश्य । म्हणोनि ज्ञान शब्दाचा विपर्यय । करीं मग प्रत्यक्ष अनुभवीं ।। ३९:५७ ।। परिसिला तुझा ज्ञान-पदार्थ । अज्ञान घेतां काय रे वेंचत । 'अज्ञान' वाणीचा विषय होत । ज्ञान हें शब्दातीत स्वयें ।।३९:५८ ।।** शेवाळाप्रमाणे अज्ञान ज्ञानाला झाकून टाकते. ज्ञान हे स्वयंसिद्ध, स्वयंप्रकाशित व शुद्धस्वरूप आहे. ज्ञान स्वत:च जाणण्याचा, अनुभवण्याचा विषय आहे; उपदेशाचा नव्हे. लक्षात ठेव की, 'प्रणिपात' व 'परिप्रश्न' ही सद्गुरुकृपा व्हावी यासाठीची साधने आहेत.

देहाभिमान व स्वरूपाची जाणीव नसणे, हे अज्ञान आहे. त्याचप्रमाणे देव आणि भक्त यांत विभिन्नता पाहणे, हेही अज्ञान होय ! अज्ञान दूर होण्यास प्रथम अंत:करणशुद्धी झाली पाहिजे. मी कर्ता, मी भोक्ता.... हा 'मी' जोवर नष्ट होत नाही तोपर्यंत अंत:करणशुद्धी होणार नाही. 'मी'-'माझे' ही अहंता सोडून, ममता त्यजून भक्तिपूर्वक भगवंताच्या भजन, पूजन, कीर्तन, स्मरण, चिंतनाने अंत:करण शुद्ध, निर्मळ होऊ लागते. शरणागत भाव येऊन कर्मे निष्काम बुद्धीने व ईश्वरार्पण वृत्तीने होऊ लागतात. त्यासाठी नित्यानित्यवस्तू-विवेकाची साधना सांगितली आहे :-

**नित्यानित्यवस्तुविवेचन । श्रवण मनन निदिध्यासन । करा व्हा शमदमादिषट्क संपन्न । तेणेंच निवर्तन अज्ञाना ।। श्री साईसच्चरित ५०:८८ ।।** मग अविद्येचे निर्मूलन होईल. ज्ञान स्वत:च प्रगट होईल.

या अज्ञानाला कारणीभूत आहे माया. श्री साईबाबा सांगतात, ही चेटकीण ज्ञानींनाही फसवते. लहान ढग सूर्याला झाकून टाकतो, त्याप्रमाणे माया अपल्या आवरण शक्तीच्या बळावर आत्मस्वरूपाला आच्छादित करते. सर्वव्यापी परमेश्वराला ती आच्छादित करीत नाही, तर ती माणसाची बुद्धी आच्छादिते. मायेचे स्वरूप वर्णन करतात, **"हे जें अवघें दिसतसे जगत् । तो मायेचा खेळ सत्य । मायाब्रह्म एकचित्त । होऊनि ब्रह्मांड रचियेल ।।" भक्तलीलामृत ५७:१०९ ।।** या चैतन्याची शक्ती ती माया. ब्रह्म आणि माया पृथक करता येत नाही, जसे सूर्य आणि त्याची प्रभा ! या मायेचा महिमा अगाध आहे. जे 'एक'च आहे ते विभागलेले भासते ते मायेमुळे. हा भास सत्य वाटतो तो मायेमुळे. मायेचे हे आवरण दूर झाले की, शुद्ध चैतन्य दृग्गोचर होते. हीच सत्वस्तू. आत्माच सत्वस्तू. त्याला

जाणणे, हा अध्यात्माचा खरा हेतू आहे. असत् 'सत्' मानल्यामुळे निर्माण झालेले द्वैत ते अज्ञान; ते दूर झाले की, स्वयंप्रकाशित आत्मा दिसू लागतो.

सृष्टी हे कार्य व ईश्वर हे कारण याचा विसर पडल्यामुळे देह म्हणजे मी व माझ्या देहाला मिळणारे सुखसमाधान हे माझे सुख हा विचार हळूहळू दृढ होतो. 'देहोऽहं' ही जाणीव रुजली की, मनुष्य मायाजाळात अडकतो. **कल्पनेचें जें जें स्फुरण । तेंच मायेचें निवासस्थान । बद्धमुक्त स्थितीचें जनन । कल्पनेमधून निश्चित ।। श्री साईसच्चरित ५०:७५ ।।** बाबा सांगतात, अशी ही माया तरून जाण्यास अवघड आहे. तिचे निरसन होण्यास उत्तम उपाय म्हणजे भगवद् भजन. मरण येईल तेव्हा येवो; पण हरिनामाचा विसर कधी पडता कामा नये. अखंड नामस्मरण करा! ईश्वरचिंतनात मन गुंतवा! **''चित्तें करा हरिगुरुचिंतन। श्रवणें करा चरित्रश्रवण। मनें करा ध्यानानुसंधान। नामस्मरण जिव्हेनें ।।'' श्री साईसच्चरित ३९:९५)** मायेचे आच्छादन दूर होईल. अज्ञान समूळ नाश पावेल.

गीतेतील तिसऱ्या अध्यायात ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग दोन्ही एकाच फलप्राप्तीची साधने आहेत, असे सांगितले आहे. अधिकारी भिन्नभिन्न आहेत. प्राप्तकर्म करणाऱ्या साधकांना, सर्वसामान्य सांसारिक जनांना एकदम ज्ञानमार्ग सांगणे योग्य नाही. यथाशास्त्र स्वधर्माचे आचरण आणि यथाविधी निर्दोष कर्म करण्यात मनुष्यजन्माचे सार्थक आहे. कारणदेह असेपर्यंत कर्मे करावीच लागतात. चौथ्या अध्यायात निष्काम कर्माची उपासना सांगितली आहे. त्यासाठी शरणागत भावाने सर्व विहित कर्मे बुद्धीने ईश्वरार्पण करणे जरूरीचे आहे.

ज्ञानयोग व कर्मयोग एकमेकांना पूरक आहेत. ज्ञाननिष्ठा - प्राप्तीचा उपाय कर्मयोग आहे. कर्मयोग याचा अर्थ साम्य बुद्धीने कर्माचरण करणे. ज्ञानी पुरुष आपली सर्व कर्मे भगवंताप्रीत्यर्थ, अहंकाररहित, निष्काम वृत्तीने करतात. या अध्यायाचे वैशिष्ट्य सांगताना पू. सोनोपंत दांडेकर म्हणतात, ''भगवंतांनी ३ऱ्या अध्यायात कर्माचरण सांगितले आहे. परंतु, कर्म आचरीत असताना त्यात अज्ञानाचे जे बंध आहेत त्यातून सोडवणूक करून घेऊन मोक्षापर्यंत जावयाचे असेल, तर सर्व कर्मे ब्रह्मार्पण बुद्धीनेच केली पाहिजेत. शरीर, मन, वाणीद्वारा विहित कर्मे ईश्वराप्रीत्यर्थ करून त्यालाच अर्पण करणे जरूरीचे आहे. म्हणून ही उपासना करावी, हे सांगण्याचे प्रयोजन या अध्यायात आहे.''

भगवंत म्हणतात,सर्व कर्मे मला अर्पण कर; म्हणजे तू कर्मबंधनातून मुक्त होशील :- **''जे खासी होमीसी देसी जें जें आचरिसी तप । जें कांहीं करिसी कर्म तें करी मज अर्पण ।।'' गीताई ९:२७।। ''अज्ञाने तोडूनि सर्व कर्म-बंध शुभाशुभ । योग-संन्यास सांधूनि मिळसी मज मोकळा ।।'' ९:२८ ।।** श्री सांईबाबा कर्मसिद्धांत समजावून सांगताना म्हणतात, **''कर्तव्य आपण करावें। कर्तृत्व ईश्वरा द्यावें। फलही त्यासीच समर्पावे। अलिप्त आपण रहावया ।।'' भक्तलीलामृत ३२:१७ ।।** श्री साईबाबा सांगतात की, बऱ्यावाईट कर्मातूनच आपण आपले देहप्रारब्ध निर्माण करतो. पुढील जन्माची तयारी करतो. संसारात अडकतो. त्यातून सुटण्याचा मार्ग म्हणजे शुद्ध, निर्मळ कर्माचरण करून सात्त्विक वृत्ती वाढविणे. देवाची ओढ लागते आणि मुक्तीसाठी जीव तळमळतो तेव्हा परमेश्वर सद्गुरुची भेट घडवून आणतो.

श्री साईबाबा प्रापंचिकांना उपदेश करताना सांगत की, अध्यात्मात चित्तशुद्धी फार जरूरीची आहे. त्यांनी कथा-दृष्टांतांतून नीतिमूल्य जीवन जगण्याची शिकवण दिलेली आहे. कर्मानुसार जन्म मिळतात. जन्मोजन्मीच्या कर्मामुळे संचित कर्मातून या जन्माचे प्रारब्धकर्म तयार होते. सुखदुःखभोगरूप प्रारब्धकर्म भोगल्यावाचून निवृत्त होता येत नाही. श्री साईबाबा म्हणतात, **''या अधिक उण्याचे कारण। एक देह-प्रारब्ध जाण। ते अवघें भोगिल्याविण। कालत्रयी सुटेना ।।'' ३२:३८ ।।** सुखदुःख ही भ्रांती आहे, पाण्यावर उठणाऱ्या तरंगाप्रमाणे आहे. माणसातले षड्रिपू, म्हणजे काम, क्रोध, लोभ,

मोह, मत्सर, मद इंद्रियांना विषयात ओढतात आणि दुःखास कारणीभूत होतात. बाबा पुढे सांगतात, आपण प्रपंच विवेकपूर्ण करावा. सदाचाराने वागावे. आपल्या कुवतीनुसार दानधर्म, अन्नदान करावे. कर्तव्ये-कर्मे फलाशा न ठेवता करावीत. फल ईश्वरार्पण करावे. ''तोच कर्ता'' असून ''मी करतो' हा अहंकार आहे. **''ऐसे प्रत्येकाने वागावे। कर्तव्य आपुले करावे। ते करीत असता ओळखावे। सच्चिदानंद ईश्वरा ॥'' भक्तलीलामृत ३२:१०३ ॥** प्रयत्न करावेत, यश मिळवावे व पुरुषार्थ साधावा. यशाची, फळाची अपेक्षा वा अभिमान न धरता करावे. हरिनामात मन गुंतवावे; अन्यथा, मृत्यूच्या वेळी ते मुखी येणार नाही. त्यासाठी अखंड नामजप करावा. **''हे पुरुषधर्म कथिले तुजसी। ऐसा जो वागे तयासी। बद्धस्थिति न बाधे विवशी। सदाचारीं वर्तल्या ॥'' भक्तलीलामृत ३३:४९ ॥**

**''दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रह हेतुकम।**
**मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुष-संश्रयः ॥ (विवेकचूडामणि)**

मनुष्यत्व, मुमुक्षुत्व आणि महापुरुषांची संगती ही तीन फार दुर्लभ आहेत. परमेश्वराच्या कृपेनेच ती प्राप्त व्हायची. शास्त्रपठण, यज्ञ, कर्मे, उपासनांनी मुक्ती साधत नाही. आत्म्याच्या एकतेच्या बोधाविना व्यर्थच. म्हणून सच्छिष्याने शुद्ध हृदय आणि विशाल बुद्धीने युक्त अशा संत, महात्मे, सद्गुरूंजवळ जाऊन त्यांनी उपदेशिलेल्या अर्थांमध्ये चित्ताची एकाग्रता करून मुक्तीसाठी प्रयत्न करावा. गीतेत अ. ४, श्लोक ३४मध्ये **''ज्ञानोपदेश देतील ज्ञानी अनुभवी तुज''**, म्हटले आहे. कर्मे चित्ताच्या शुद्धीकरिता आहेत, आत्मवस्तूप्राप्तीकरिता नाहीत. मोक्षाला साधनीभूत ठरणाऱ्या गोष्टींत भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. आत्मा-अनात्मा यांच्या विवेकाने निश्चल ज्ञान प्राप्त होते. सज्जनांची संगती, वासनात्याग आणि हरि-चरणांचा भक्तियोग यांमुळे चित्तातले विषय नाहीसे होऊन मन हळूहळू शांत होते. अंतःकरणात सत्त्वगुणाची उत्पत्ती होऊन ज्ञानाचा उदय होतो. यावरून श्री साईबाबांनी गीतेचा ४था अध्याय व ३४वा श्लोक विवरणासाठी का घेतला, याचा बोध होतो.

साक्षात्कारी सद्गुरुची भेट पूर्वजन्मीच्या साधनेच्या पुण्याईने होते. ज्याला आपल्या आत्म्याचे परब्रह्माशी तादात्म्य झाल्याची पूर्ण जाणीव आहे तो सद्गुरु. असे सद्गुरु अधिकारी शिष्यांना आत्मज्ञानाचा उपदेश करून कृतार्थ करतात, तर सर्वसामान्य भक्तजनांना व शिष्यांना त्यांच्या कुवतीनुसार उपदेश वा साधना देतात; कारण सद्गुरूंना शिष्याचे भूत-भविष्य आणि अधिकार ज्ञात असतात. हेही सत्य की, साधकाच्या प्रगतीनुसार गुरु भेटत असतात. श्री साईसच्चरितात अध्याय ३२मध्ये गुरु कसा असावा व कसा नसावा, याचे सुंदर विवेचन केलेले आहे. बाबा सांगतात, **''जयाचा बोल झोंबेना वर्मीं। साक्षी न पटे अंतर्यामीं। तयाचें गुरुत्व काय कामीं। व्यर्थ रिकामी वटवट ती ॥''** चौथा पुरुषार्थ मोक्ष. तो परमगुरुशिवाय प्राप्त होणे शक्य नाही. दाभोलकर गुरु-सद्गुरु आणि अवतार यांचे वर्णन करताना बाबांविषयी म्हणतात, **आपुल्या धार्मिकत्वाची ख्याति। व्हावी झेंडे फडकावे जगतीं। हें लवही न जयाचे चित्तीं। ऐसी ही मूर्ति साईंची ॥ १०:६३ ॥ देहाभिमाना न जेथें वसती। शिष्याठायीं अत्यंत प्रीति। सदैव जेथें हेचि प्रवृत्ति। ऐसी ही मूर्ति साईंची ॥६४॥** नियत आणि अनियत गुरूंचे कार्य भिन्न असते. 'अनियत गुरु' अंतःकरणशुद्धीचे उपाय सांगून शिष्याला मोक्षाच्या मार्गाला लावतात. 'नियत गुरु' शिष्याला स्वरूपी स्थिर करतात :- **नियत गुरुशीं होतां सख्य। द्वैत जाऊनि होय ऐक्य। 'तत्त्वमसि' महावाक्य। तयाची साक्ष तो दावी ॥६७॥ चराचरीं भरले गुरु। भक्तार्थ होती साकारु। सरतां अवतारकार्यभारु। निजावतारु संपविती ॥६८॥ या द्वितीय कोटींतील साई। चरित्र तयांचें वर्णूं मी कायी। जैसी तो मज बुद्धि देई। तैसेंचि होई लेखन हें ॥६९॥ लौकिकी विद्यांचे अनेक गुरु। स्वरूपीं स्थापी तोचि सद्गुरु। समर्थ तोचि जो दावी भवपारू। महिमा अगोचरू तयाचा ॥७०॥ जो जो**



**जाई कराया दर्शन। तयाचें भूत भविष्य वर्तमान। साई न पुसतां करिती निवेदन। ऊण-खूण संपूर्ण ॥७१॥** बाबा प्रत्येक भक्ताच्या कामना, ग्रहणशक्ती व अधिकारानुसार मार्ग दाखवत. लाखो लोक साईबाबांना आपले दैवत मानतात. घराघरातून त्यांची पूजाअर्चा, उपासना चालते. प्रार्थनेला त्वरित साद देणारा हा देव भक्तांचा, साधकांचा सद्‌गुरु आहे. श्री साईबाबांवर आपण आपली श्रद्धा व निष्ठा ठेवली, तर इतरत्र गुरुचा शोध घेण्याची जरूरी भासणार नाही.

श्री साईबाबा आपल्या गुरुविषयी अत्यंत आदराने, प्रेमाने व भक्तिभावाने बोलत असत. ते सांगत की, जो शिष्य अत्यंत विनम्र होऊन, संपूर्ण शरणागती पत्करून गुरुचरणी लीन होतो तो पवित्र व शुद्ध होतो.... गुरुला कशाचा त्रास होत असेल, तर शिष्याच्या अहंकाराचा. लक्षात ठेवा की, सद्‌गुरुचा उपदेश फक्त सच्छिष्यालाच होऊ शकतो. ज्या शिष्याने आपले तन, मन, धन गुरुचरणी अर्पण केले आहे अशा सच्छिष्याला सद्‌गुरु धर्मग्रंथातील 'सत्' जाणण्यास शिकवितात. अशा शिष्याचे अंतर्बाह्य जीवन गुरुमय झालेले असते व ब्रह्मजिज्ञासा जागृत झालेली असते. त्याचा विवेक दृढ झालेला असतो की, अध्यात्म साधना सर्वश्रेष्ठ आहे. मायेने व तिच्या कार्याने अप्रगट असलेले शुद्ध आत्मतत्त्व जाणून घेण्यासाठी तेव्हा तो सद्‌गुरुला शरण जातो.

श्री साईबाबा, हे आत्मज्ञान सद्‌गुरूंकडून कसे प्राप्त करावे हे श्लोकातील **''तद् विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।''** या चरणातील प्रत्येक शब्दाची फोड करून अर्थ स्पष्ट करताना सांगतात, ''सद्‌गुरूंना अनन्य भावाने शरण जावे. तन-मनाने, भक्तियुक्त अंतःकरणाने सेवा करावी. अशाप्रकारे सद्‌गुरूंना प्रसन्न करून घ्यावे. तदनंतर साष्टांग प्रणिपात करावा. 'प्रणिपात' म्हणजे केवळ पाया पडणे नव्हे; तर साष्टांग दंडवत घालणे होय ! मग विनम्र भावाने, जिज्ञासू वृत्तीने प्रश्न विचारावेत. 'परिप्रश्न' म्हणजे, गुरुच्या ज्ञानाची परीक्षा घेण्यासाठी प्रश्न विचारू नयेत; तर 'सत्य' ज्ञान जाणण्याच्या जिज्ञासू वृत्तीने व शंका निवारण्यासाठी आस्थेने पुनः पुनः प्रश्न विचारणे होय ! तसेच, 'सेवा' म्हणजे चरणसंवाहन नाही; तर देहच त्यांच्या चरणी वाहिलेला असल्याने त्यांच्या सेवेकरिता तो अर्पण करीत आहोत, ही भावना असावी. कोणते प्रश्न विचारावेत तेही सांगतात, ''बंध म्हणजे काय ?'' ''मोक्ष म्हणजे काय ?'' ''विद्या कशाला म्हणावे ?'' ''अविद्या कशी जाणावी ?'' ''आत्मा कोण आणि परमात्मा कोण ? त्या दोघांची एकता कशी ओळखावी ?''.... नम्रभावाने केलेल्या सेवेमुळे, विनयपूर्वक विचारलेल्या प्रश्नांमुळे आणि जिज्ञासू वृत्तीमुळे सद्‌गुरु प्रसन्न होतील. मग त्यांच्याकडून परमश्रेष्ठ मोक्षाचे अद्वितीय असे परमात्म्याचे ज्ञान समजावून घे ! म्हणजे ज्ञानी, तत्त्वदर्शी ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरु तुला ज्ञानाचा उपदेश करतील.

श्लोकातील तिसऱ्या चरणाचे **''उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं''** चे विश्लेषण करताना बाबांनी अध्यात्मातील तत्त्वांचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण केले आहे. नानांना त्यावर मनन, चिंतन करण्यास सांगून म्हणतात, **''त्यांतील 'ते' अक्षरापाठीं। 'अ'कारार्थी अवग्रहापोटीं। अज्ञानपदें अर्थपरिपाटी। होते कां उफराटी पाहीं पां।।'' श्री साईसच्चरित ५०:४८।।** त्यामुळे चरणाच्या शब्दार्थाऐवजी त्यातील सत्यार्थ तळहातावरील आवळ्याप्रमाणे स्पष्ट होऊ लागतो. कारण, सांगतात, **''ज्ञानपदाआधीं अवग्रह एक। 'अज्ञान' निदर्शक निघतसे ॥''** ५०:६७ ॥ तेव्हा, अज्ञान अगोदर जाण; मग मनःशुद्धी होऊन स्वयंप्रकाशित ज्ञानाचा बोध होईल. ''मी कर्ता-भोक्ता'', अहंकार ही सारी अज्ञानाची लक्षणे आहेत. ज्ञान हा अनुभवण्याचा विषय आहे. तो व्यक्त करता येत नाही. ज्ञानेश्वरांनीही अज्ञान लक्षणेच विस्तृतपणे सांगितली आहेत. अज्ञान काय, हे जाणल्यावर 'ज्ञान' जाणता येते.

परब्रह्म वस्तुलाच ज्ञेय म्हणून संबोधिले जाते. ते केवळ आत्मज्ञानानेच ज्ञात होते. ते जाणल्यानंतर काही कर्तव्य उरत नाही. ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान ही त्रिपुटी संपते. ही त्रिपुटी

अविद्येच्या पोटी जन्म घेते. खऱ्या ज्ञानात तिचा लय होतो. सामान्य ज्ञानात त्रिपुटीचा उदय होतो; कारण सामान्य ज्ञानात भेदावस्था आहे. कर्माचा पसारा वाढतो. जीव प्रपंचात जखडला जातो. तर, अध्यात्म ज्ञानात लयावस्था आहे. त्यात कर्माचा लय होऊन जीव मुक्त होतो. परमात्मा ज्ञानगम्य आहे. ज्ञानानेच त्याची प्राप्ती होते. इतर ऐहिक व पारलौकिक विषयांची ज्ञान करून देणारी ज्ञाने अज्ञानमूलक आहेत. ती भ्रांतीमूलक आभास निर्माण करणारी आहेत. व्यावहारिक ज्ञानाच्या पलीकडे सत्य ज्ञान आहे. तेच सम्यक ज्ञान होय ! अपरोक्ष अनुभव म्हणतात तो हाच. अध्यात्म शास्त्र हे सत्य ज्ञान सांगणारे शास्त्र आहे, अशी ज्याची श्रद्धा अढळ झाली आहे तो अध्यात्म मार्गात प्रवेश करण्यास योग्य होतो. ईश्वरोपासना व शमदमादि षट्काने अंतःकरणशुद्धी होऊन वासना क्षीण होतात; मन अंतर्मुख बनते; खरे सुख कशात आहे, याचा वेध मन घेऊ लागते. ईशकृपेने गुरुभेट होते.

बाबा सांगतात, ''संसार करा; पण त्यात अडकू नका. कुमार्गाने पैसा कमवू नका. वादविवाद टाळा ! निंदा करू नका. पेराल तेच उगवेल. प्रत्येक कर्म विवेक बुद्धीने, निष्कामतेने करा ! कर्ता ईश्वर आहे, हे जाणून फलही त्यालाच अर्पण करा ! मग कर्मे तुम्हाला चिकटणार नाहीत. तुमचे अंतिम ध्येय आहे मोक्ष, हे कधी विसरू नका. जे दृष्य आहे ती सर्व माया आहे. अज्ञान हे मायेचे बीज आहे. ज्ञानावर पसरलेले शेवाळ आहे. ते दूर केले की, स्वयंप्रकाशित ज्ञान प्रगट होईल. ज्ञान परिणाम नसून स्वयंभू आहे. मनापलीकडील हे ज्ञान अर्वाच्य आहे. साक्षात्कारातून, अनुभूतीतूनच त्याची प्रचीती घेता येते.

साधुसंतांनी आत्मज्ञान हे जीवनध्येय आणि नरदेहाचे सार्थक आहे, असे म्हटले आहे. ज्ञानाची आवड नाही, ओढ नाही, त्याचे जीवन निरर्थक आहे. साधकांसाठी ज्ञानयोगी ही अंतिम पायरी आहे. ईशकृपेने सद्गुरुची भेट होते. शिष्याच्या सेवेने, जिज्ञासेने प्रसन्न झालेले गुरु त्याला आत्मबोधाचा उपदेश देतात.

गीतेतील उपदेश देशकालातीत आहेत. आदर्श जीवन जगण्याची कला शिकवणारी गीता विश्वात्मक आहे. कोणताही अट्टाहास, हट्टाग्रह, एकांगी दृष्टिकोन न ठेवता जीवनसूत्रे सांगणारे शास्त्र आहे. म्हणून त्यात संघर्ष नाही; समन्वय आहे. श्री साईबाबांनी गीतेतील ४था अध्याय व ३४व्या श्लोकावरील केलेले विश्लेषण आजच्या विचारप्रवाहाशी सुसंगत आहे, हे कळते. त्यात प्रापंचिकांना दिलासा आहे, भक्तांना आश्वासन आहे, साधकांना मार्गदर्शन आहे. श्री साईसच्चरितात ३९ व ५०व्या अध्यायांत श्री साईबाबांनी उघड केलेले भगवान श्रीकृष्णाचे मनोगत बाबांनी सोप्या भाषेत तसेच मांडले आहे. त्यांनी केलेले स्पष्टीकरण, मांडलेले विचार मनाला अंतर्मुख करणारे आहेत, मार्गदर्शनपर आहेत. 'श्री साईसच्चरित' हे बाबांचेच कथन आहे. **''तो तर केवळ निमित्त पाहें। लिहावें माझें मींचि की ॥''** २:७६ ॥.... **''माझी कथा मींच करावी.''** म्हणून पारायण करताना उपदेश व शिकवणीतील बोधवाक्यांमधील तत्त्व जाणण्याचा प्रयत्न साधकांनी, भक्तांनी केला पाहिजे. श्री साईबाबांचे मनोगत समजून घेऊन आपले आचार, कर्तव्य-कर्मे केल्याने साईभक्ती फळेल, फुलेल. यादृष्टीने दाभोलकरांच्या पुढील ओव्या फार बोलक्या आहेत :-

**साई सप्रेम करुणाघन। नानांस निमित्ता पुढें करून। तुम्हां आम्हां सकलांलागून। गीतार्थप्रवचन हें केलें॥ ३९:१०६॥**

**गीता भगवंताचें वचन। म्हणोनि हें प्रत्यक्ष शास्त्र जाण। कालत्रयींही याचें प्रमाण। कधींही अवगणन होतां नये॥ ३९:१०७॥**

**बाबांसारिख्या अवतारमूर्ति। परोपकारार्थ जगीं अवतरती। होतां इच्छितकार्या समाप्ती। अंतीं अव्यक्तीं समरसती॥ ३९:११६॥**

□□□

# ॥ साई उवाच ॥

(अध्याय ४२ व ४३)

संग्राहक : कै. प्र. का. सोमण (निवृत्त ले. कर्नल)

(मागील अंकावरून पुढे)

## अध्याय ४२वा

**पार्श्वभूमी :**

**या** अध्यायात बाबांचे निर्वाण व त्याअगोदरच्या त्यांच्या अगाध लीला यांचे सविस्तर वर्णन आले आहे. सन १९१८च्या विजयादशमीला दिवसा बाबांनी देह ठेवून निर्वाणाचा मार्ग धरला. तोच बुद्ध जयंतीचा दिवस होता व मुसलमानांची कत्तलची रात्रही तेव्हाच होती. दुर्गापूजेच्या समाप्तीचा तो पुण्य दिवस होता.

निर्वाणाच्या अगोदर सन १९१६च्या दसऱ्याच्या शिलंगणाच्या सायंकाळच्या परतण्याच्या वेळी एक अत्यंत अद्भुत घटना शिरडीत घडली. जशी विद्युल्लता एकदम कडकडावी तसे बाबांनी एकदम जमदग्नीचे रूद्ररूप धारण केले. डोक्याचे फडके व कफनी तडकाफडकी काढून ते कपडे धुनीमध्ये टाकून दिले. त्यामुळे ज्वाळा एकदम प्रदीप्त झाल्या. अचानक काय घडले, कोणालाच कळले नाही. बाबांची चित्तवृत्ती एकदम अशी क्रोधी का झाली, याचे



सर्वांना नवल वाटले. बाबा अग्नीच्या तेजाहून सतेज दिसत होते. बाबांनी अचानक आपला लंगोट फेडून ते 'दिगंबर' बनले व क्रोधाने आरक्त नयनांनी गरजले, **''करा रे आतां निदान। मी मुसलमान की हिंदू''** ॥२७॥ **''पहा जी। मी हिंदू कीं यवन आजी। निर्धारा यथेच्छ मनामाजी। आशंका घ्या जी फेडूनियां''** ॥२८॥ (मग बाबांचा अगदी जवळचा भक्त भागोजी शिंदे याने धीर केला व तो बाबांजवळ जाऊन त्यांना लंगोट नेसविण्याचा प्रयत्न करू लागला. तो म्हणाला, ''बाबा, आज शिलंगण, दसऱ्याचा दिवस व आज हे काय चिन्ह ?'' बाबांनी त्याला सटक्याने सणासण हाणून हुसकावले. बऱ्याच वेळाने बाबा शांत झाले. त्यांनी कोरा लंगोट नेसला व चावडीची मिरवणूक नेहमीच्या रात्रीच्या ९ऐवजी ११ वाजता उशिरा निघाली. त्यानंतर पुढच्याच १९१७ साली शिरडीत विजयादशमीचा सण बाबांच्या देहस्थित उपस्थितीत साजरा झाला; कारण १९१८च्या दसऱ्याला बाबांनी देह ठेवला. धन्य ते पुण्यवान शिरडीवासी, ज्यांनी बाबांच्या साऱ्या लीला प्रत्यक्ष पाहिल्या व परम सुख ज्यांना लाभले !)

**पार्श्वभूमी :**

**शि**रडीचे रामचंद्र दादा पाटील हे बाबांचे मोठे भक्त होते. ते अत्यंत आजारी झाले व त्यांना आजाराच्या यमयातना सहन होईनात. एका मध्यरात्री त्यांच्या अंथरूणाजवळ बाबांची मूर्ती एकाएकी प्रगट झाली. पाटलांनी बाबांचे पाय धरले व मला मरण केव्हा येईल ते सांगा, ही त्यांना प्रार्थना केली. तेव्हा बाबा म्हणाले : - **''न करीं चिंता चित्तीं। टळली तुझी गंडांतरभीति। किमर्थ खंती करिसी रे ॥५०॥ तुजला नाहीं कांहींच भीती। तुझी हुंडी परतली पुरती। परी न तात्याची धडगती। दिसे मजप्रती रामचंद्रा ॥५१॥ शके अठराशें चाळीस। दक्षिणायन आश्विनमास। विजयादशमी शुक्लपक्ष। पावेल अक्षयपद तात्या ॥५२॥ परी न बोलावें तयापाशीं। हाय घेऊनि बैसेल जिवाशीं। झुरणीस पडेल अहर्निशीं। मरण कोणासी आवडेना ॥५३॥''**

(पण, बाबा जरी तात्याचा निर्वाण दिन जवळ येत आहे, असे म्हणत होते, तरी प्रत्यक्षात ते स्वतःबद्दलच बोलत होते. कारण, त्यांनी स्वतःच त्या सन १९१८च्या विजयादशमीस देह ठेवला. त्याच दिवशी बाबांनी पंढरपुरला दासगणू महाराजांना स्वप्नात जाऊन दृष्टांत दिला :-

**''मशीद पडली ढांसळोनी। अवघे शिरडीचे तेली वाणी। त्रासवूनि सोडिलें मजलागूनि। जातों तेथूनि मी आतां ॥७०॥ म्हणोनि आलों येथवरी। फुलांही मज 'बख्खळ' डबरी। इच्छा एवढी पुरी करीं। चल झडकरी शिरडींत ॥७१॥''**

(हे स्वप्न पडताच, क्षणाचाही विलंब न लावता, दासगणू शिष्यांसह शिरडीत येऊन ठाकले. अष्टौप्रहर हरिनामाचा गजर सुरू केला. अंतकाळ येण्यापूर्वी बाबांनी केलेल्या लीला अण्णासाहेब दाभोलकरांच्या शब्दांत आपण ऐकू या :-

क्षणैक अवकाश प्राणोत्क्रमणाला।
न कळे काय आलें मनाला।
हस्त कफनीचे खिशांत घातला।
ती धर्मवेळा जाणोनि ॥८७॥
लक्ष्मी नामें सुलक्षणी।
नामासारिखी जिची करणी।
नित्य निरत जी साईचरणीं।
ती सन्निधानीं तैं होती ॥८८॥)

(याच लक्ष्मीला बाबा मागे एकदा म्हणाले होते :-)

**''लक्ष्मी लागलीसे भूक मातें''**

(त्याबरोबर लक्ष्मीने लगेच भाकऱ्या करून आणल्या. पण, त्या बाबांनी कुत्र्यासमोर ठेवल्या. हे पाहून लक्ष्मी बाबांवर फारच रागावली. तेव्हा, बाबा तिला म्हणाले :-)

**''व्यर्थ कशाची करितेस खंती। या कुत्र्याची जे उदरपूर्ती। माझीच तृप्ति ती जाण ॥१०३॥ या श्वानाचा जीव नाहीं कां। प्राणिमात्राच्या एकच भुका। जरी तो मुका आणि मी बोलका। भेद असे कां भुकेंत ॥१०४॥ क्षुधेनें व्याकूळ जयाचे प्राण। तयांस देती जे अन्नावदान। माझिया मुखींच तें सूदिलें जाण। सर्वत्र प्रमाण मानीं हें ॥१०५॥''**



(अशा या अत्यंत थोर भक्त लक्ष्मीला बाबांनी त्यांच्या अंतसमयी काय प्रदान केले ते ऐकू या :- जरी आला कंठीं प्राण। शरीर विगलित नाहीं त्राण। बाबा निजहस्तें करिती दान। देहावसानसमयीं तिस ॥११८॥ एकदां पांच एकदां चार। रुपये खिशांतूनि काढूनि बाहेर। ठेवीत तियेचे हातांवर। तीच कीं अखेर बाबांची ॥११९॥ कीं ही नवविधा-भक्तीची खूण। किंवा नवरात्र-अंबिका पूजन। झालें आज, आहे शिलंगण। सीमोल्लंघन-दक्षिणा ही ॥१२०॥)

(बाबांचा अंतकाळ अगदी जवळ आला, तेव्हा कोणाही भक्ताला बाबांना एकटे सोडून जाववेना. बुट्टी, काका आदि थोर भक्त त्यावेळी तेथे होते. त्यांना बाबा सांगू लागले :-)

**"जा जा जेवूनि या जा आतां।"** (ऐसें समस्तां आज्ञापिती. ते सारे जेवावयास गेले मात्र; आणि बाबांनी बयाजी आप्पा कोते यांच्या अंकावरती देह सोडला. परब्रह्म ज्याचें वैभव। तया कैंचा निधनसंभव... ॥१४६॥ बाबांसारखी मायाळू जननी। पडली कैसी काळाचे वदनीं। दिवसा ग्रासी अंधारी रजनी। तैसीच ही कहाणी झाली कीं॥ १५०॥)

**॥ अध्याय ४२वा समाप्त ॥**

## अध्याय ४३वा

**पार्श्वभूमी :**

**बा**बांनी देह ठेवला. त्या देहातील अंतिम क्षणी बाबांनी जास्तीत जास्त भक्तांना, "जा जा जेवायला जा !", असा आदेश देऊन आपणापासून दूर पाठविले व प्रत्यक्ष प्राणोत्क्रमण झाले, तेव्हा अगदी मोजके भक्त जवळ होते. हा दारुण प्रसंग कळल्यावर सर्व शिरडीवासीयांचे हृदय विदीर्ण झाले. अण्णासाहेब वर्णन करतात :-

जो उठे तो पळत सुटे। मशीद मंडप गच्च दाटे। अवस्था पाहोनि हृदय फाटे। कंठ दाटे दुःखानें ॥८८॥ गेलें शिरडीचें वैभव सरलें। सुखसौभाग्य सर्व हारपलें। डोळे सर्वांचे अश्रूंनीं भरले। धैर्य भंगलें सकळांचें ॥८९॥ बाबांवीण शिरडी ओस। दाही दिशा शून्य उदास। प्राण जातां जे शरीरास। कळा शिरडीस ते आली ॥९३॥ सुकोनि जातां तळ्यांतील जीवन। तळमळती जैसे आंतील मीन। तैसे झाले शिरडीचे जन। कलाहीन उद्विग्न ॥९४॥ कमलावीण सरोवर। पुत्रावीण शून्य घर। कीं दीपावीण मंदिर। मशीदपरिसर तो तेवीं ॥९५॥ कीं घरधन्यावीण घर। कीं राजयावीण नगर। कीं द्रव्यावांचूनि भांडार। शिरडी कांतार बाबांविणें ॥९६॥ जननी जैसी अर्भका। किंवा मेघोदक चातका। तेंचि प्रेम शिरडीचे लोकां। आणिक भक्तां सकळिकां ॥९७॥ शिरडी झाली कलाहीन। मृतप्राय हीन दीन। जीवनेंवीण जेवीं मीन। तेवीं जन तळमळती ॥९८॥ वर्जितां कांता निज-भ्रतारें। अथवा माता स्तनींची पोरें। जैसीं गाईचीं चुकलीं वासरें। लहान थोरें त्यापरी ॥९९॥ अनिवार हे दुःखावस्था। झाली शिरडीच्या जनां समस्तां। विदोविदीं अस्तावेस्ता। जन चौरस्ता धांवती ॥१००॥ साईंमुळेंच शिरडी पवित्र। साईंमुळेंच शिरडी चरित्र। साईंमुळेंच शिरडी क्षेत्र। साईच छत्र सर्वांतें ॥१०१॥

बाबा गेल्यावर साईभक्तांना त्यांची शिकवण आठवू लागली :-

**"तुम्ही कोणासी बोलतां उणें।**
**मजला तात्काळ येतें दुखणें"....॥११०॥**
**बरें नव्हें कोणातें छळणें।**
**तेणें येतें मजला दुखणें"....॥१३७॥**

(बाबा एकदा एका मोठ्या भक्ताजवळ म्हणाले होते :-)

**"आठा वर्षांचा बाळ जनीं।**
**प्रगट होईन मी मागुतेनि॥".**



(ऐसें महाराज भक्तां लागूनि। आहेति सांगूनि राहिले ॥१३९॥)

(बाबा आणखी म्हणत :-)

**''हा काय एका जन्माचा निर्बंध।**
**बहात्तर पिढ्यांचा ऋणानुबंध।''**
(भक्तांचा बाबांनी पूर्वसंबंध।
कथानुबंध कथियेला॥१४३॥ श्रीमंत बुट्टी मोठे भावुक। जणूं या पुढील भविष्याचें स्मारक। टोलेजंग वाडा सुखकारक। बांधूनि स्थाईक ठेविला॥१५४॥)

**पार्श्वभूमी :**

साईनाथांच्या काळात बहुतेक भक्तांची जरी पूर्ण श्रद्धा होती की, बाबा साक्षात् देव आहेत व ते आपणासाठी सर्वस्व आहेत, तरी बाबांनी देह ठेवल्यावर पुष्कळांची भावना निराळी दिसू लागली. साध्या माणसासारखेच बाबांचे कलेवर - निर्जीव देह उरला आहे, असा काही लोकांचा समज झाला. एवढेच काय, बाबांची रोज आरती उतारणारे बापूसाहेब जोगही यांपैकीच एक निघाले. पण लक्ष्मणमामा हे बाबांचे अत्यंत एकनिष्ठ भक्त होते. बाबा त्यांच्या स्वप्नात देह ठेवल्याच्या रात्री पहाटेच्या वेळी गेले व त्यांना म्हणाले :-

**....''झडकरी ऊठ चल'' ॥१६२॥ ''बापूसाहेब न येणार आज। मी मेलों हा तयाचा समज। तूं तरी काकड आरती मज। करीं पूजन समवेत'' ॥१६३॥**

(तत्काळ लक्ष्मणमामा उठले; स्नान करून, धूतवस्त्र नेसून प्रात:काळच्या नित्याप्रमाणे बाबांचे (कलेवराचे) पूजन केले.

पादप्रक्षालन गंधाक्षत-चर्चन। पुष्पपत्री तुलसीसमर्पण। धूप दीप नैवेद्य नीरांजन। दक्षिणाप्रदान मग करिती॥१६७॥)

(लक्ष्मणमामांनी कोणाचेही न मानता बाबांना गंध लावले, बाबांच्या वळलेल्या मुठी उघडून त्यांत विडा-दक्षिणा ठेवली व मग ते परत गेले. अशी श्रद्धा व असा दृढमूल विश्वास आपण सर्वांनी आपल्यात निर्माण करायचा निकराचा प्रयत्न करायला हवा; नाही का ?)

**॥ अध्याय ४३वा समाप्त ॥**



# श्री क्षेत्र अंबेजोगाई

- प्रा. डॉ. चंद्रकांत धांडे

मराठवाड्यातील तुळजाभवानीचे तुळजापूर, रेणुकेचे माहूर, त्याचप्रमाणे अंबेचे अंबेजोगाई हे तीर्थक्षेत्र भाविकांचे श्रद्धास्थान आहे. निसर्गरम्य परिसरात वसलेल्या या क्षेत्राचा 'वैभवसंपन्न नगर' असा उल्लेख प्राचीन इतिहासात आढळतो. येथील देवी 'योगेश्वरी' या नावाने प्रसिद्ध आहे. कधी काळी येथे असलेल्या यज्ञयागादि धार्मिक कृत्ये करणाऱ्या ऋषीमुनींना दंतासूर नावाचा राक्षस त्रास देत असे. देवीने या राक्षसाचा वध केला, अशी कथा आहे. येथे शालिवाहन शकाच्या अकराव्या शतकात यादवांचे राज्य होते. राजा सिंधणदेवाचा सेनापती खोलेश्वर याच नगरीत राहत होता, अशी माहिती डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांनी नमूद केली आहे. अंबेजोगाई हे शहर बीड-नांदेड या मार्गावर जयंती नदीच्या काठावर वसलेले आहे. पूर्वी परभणीमार्गे रेल्वेने परळी स्थानकावर उतरून येथे बसने यावे लागत असे. आता मनमाड-हैदराबाद रेल्वे परळी स्थानकावरून जाते. परळी-अंबेजोगाई हे पंधरा किलोमीटर अंतर आहे. आता सर्व प्रमुख शहरांशी अंबेजोगाई येथून राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांनी संपर्क आहे.

**योगेश्वरी अंबेचे अंबेजोगाई हे क्षेत्र देवीक्षेत्र म्हणून भाविकांमध्ये प्रसिद्ध आहे. मराठीचे आद्यकवी मुकुंदराज आणि 'गीतार्णव'कार दासोपंत यांची नगरी म्हणूनही या क्षेत्राचा लौकिक मोठा आहे. अशा या ऐतिहासिक नगरीचा महिमा -**

अंबेजोगाई शहराच्या मध्यवस्तीत पूर्व-पश्चिम रस्त्यावर भव्य प्रवेशद्वार आहे. आत प्रवेश केला की, मंदिराचा परिसर सुरू होतो. येथे ओटीचे साहित्य, नारळ, फुले, प्रसादाची दुकाने आहेत. येथे 'कलमा' या नावाने प्रसिद्ध असलेली बर्फी भाविक आठवणीने घेतात. मंदिराचे प्रवेशद्वारही भव्य असून पूर्वाभिमुख आहे. आतील भव्य परिसराच्या मध्यभागी योगेश्वरीचे मंदिर आहे. मंदिराच्या चारही दिशांना दगडी कमानी असून ओटे बांधलेले आहेत. नवरात्रात भाविक येथे मुक्काम करतात. मंदिराचा कळस भव्य असून त्याखाली चार शिखरे आहेत. उंच शिखरावर देवदेवतांच्या सुंदर मूर्ती आहेत. मुख्य मंदिराचे लहान दगडी प्रवेशद्वार असल्याने भाविकांना नतमस्तक होऊनच मंदिरात प्रवेश करावा लागतो. प्रवेशद्वारापुढे भव्य यज्ञकुंड आहे. येथे उभे राहिले असता देवीचे दर्शन होते. आतील बांधकाम हेमाडपंती पद्धतीचे असून दगडी स्तंभ आणि ओवऱ्या कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराप्रमाणेच आहेत. ओवऱ्यांमधील ओट्यांवर विष्णू, महादेव, गणपती, तुळजाभवानी, गजलक्ष्मी यांची मंदिरे आहेत. स्तंभावरील व छतावरील नक्षी वेधक आहे. गाभाऱ्यात जाण्याचा मार्ग अरुंद आणि प्रवेशद्वारही लहान आहे.

## जोगाईची मूर्ती आणि उत्सव

गाभाऱ्यातील अरुंद जागेत सुमारे चार फूट उंचीचा ओटा आहे. ओट्यावर देवीचा तांदळा आहे. पूर्वी ओट्यावर असलेल्या समईच्या प्रकाशातच देवीचे दर्शन होत असे. आता वीज आल्यामुळे प्रकाशाची सोय झाली आहे. येथे चैत्र महिन्यात 'शाकंभरी उत्सव' असतो. देवीने दुर्गम नावाच्या राक्षसाचा वध केला आणि दुष्काळात विपुल शाकभाज्या उत्पन्न केल्यामुळे तिला दुर्गा आणि शाकंभरी अशी नावे मिळाली. शाकंभरी उत्सवात घरोघरी कुलाचार असतो. देवीला विपुल भाज्यांचा नैवेद्य दाखवतात. आश्विन महिन्यात येथे नवरात्र असते. या

काळात अनेक धार्मिक विधी होतात. कीर्तन, प्रवचन, भजन, सप्तशतीचे पाठ असे अनेक कार्यक्रम होतात. अष्टमीच्या दिवशी होम असतो. या मंदिरात नेहमीच भाविकांची गर्दी असते. योगेश्वरी अनेक कोकणस्थ घराण्यांची कुलदेवता आहे. ती कोकणस्थांची कुलदेवता कशी झाली, याविषयी पौराणिक कथा आहेत. विवाहासारखे मंगलकार्य झाल्यानंतर कोकणातील मंडळी येथे देवीची पूजा, अभिषेक, महानैवेद्य करून वस्त्रे अर्पण करतात.

## कुमारी योगेश्वरी

अंबेजोगाई येथील देवी योगिनी म्हणून योगेश्वरी झाली. ही अखंड कुमारी आहे. परळी येथील वैद्यनाथाशी तिचे लग्न ठरले होते. पहाटे कोंबडा आरवण्यापूर्वी नवरदेव आणि वरात आली पाहिजे, अशी तिची अट होती. नवरदेव वेळेवर आला नाही, तर सर्वजण दगड होतील, असे तिने सांगितले होते. प्रत्यक्षात नवरदेव वेळेवर आला नाही. उशिरा आलेल्या वऱ्हाडातील हत्तीं, घोडे, माणसे दगड झाली. नवरदेव भुयारातून पळून गेला म्हणून वाचला. मंदिराच्या मागील वेशीबाहेर आजही हत्ती आणि दगड दिसतात. येथून परळीपर्यंत भुयारी मार्ग आहे, असे म्हणतात. नवरदेव वेळेवर आला नाही म्हणून योगेश्वरी कुमारीच राहिली, अशी कथा आहे.

**''आकाश ग मंडप । जमीन ग भवलं ।**
**जोगाबाईचं ग माझ्या । नाही लगीन लागलं ॥''**

अशाप्रकारचे उल्लेख या परिसरातील लोकगीतांत आहेत.

## आद्य मराठी कवी - मुकुंदराज

मराठी भाषेचा पहिला लिखित उल्लेख कर्नाटकातील श्रवण बेळगोळ येथे शके ९०५मध्ये उभारलेल्या बाहुबलीच्या मूर्तीखाली आढळतो. त्यानंतर मराठी भाषेला शके ११९०मध्ये मुकुंदराजांनी लिहिलेल्या **'विवेकसिंधू'**ने ग्रंथरूप लाभले, असे दिसते. मराठी ग्रंथरचनेचे आद्यपीठ म्हणून या नगरीला ऐतिहासिक महत्त्व आहे. 'विवेकसिंधू' या ग्रंथात गुरु-शिष्य संवादरूपाने वेदांतविषयक राजयोगाचे निरूपण केलेले आहे. या ग्रंथात

**''तरी आदिगुरु श्री आदिनाथ । तेथूनि श्री हरिनाथ ।**
**तयाचा शिष्य रघुनाथ । तो गुणसिंधू ॥''**

अशी गुरुपरंपरा मुकुंदराजांनी सांगितलेली आहे. या ग्रंथाच्या पूर्वार्धात ७ प्रकरणे, ओवीसंख्या ७७७ व उत्तरार्धात ११ प्रकरणे, ओवीसंख्या ८८७ असून एकूण १६६४ ओव्यांचा हा ग्रंथ आहे. संस्कृत भाषेतील ग्रंथांत आलेले अद्वैत तत्त्वज्ञान मराठी भाषेत सुसंगत रीतीने मांडले, ही मुकुंदराजांची अविस्मरणीय कामगिरी आहे. मुकुंदराजांचा काळ, त्यांचे वास्तव्यस्थान, त्यांची ग्रंथरचना यांविषयी विद्वानांत अनेक मतभेद आहेत.

अंबेजोगाई येथील राजा जयंत यास वादात पराभूत करून जैत्रपाल नावाच्या जैन राजाने त्यास राज्यभ्रष्ट करून सत्ता हस्तगत केली. त्याच्या जुलमाने अनेकांनी जैनधर्म स्वीकारला; पण साधू त्यास वश झाले नाहीत. आपल्याला सिद्धी प्राप्त व्हावी म्हणून जैत्रपालाने यज्ञ केले. अन्नछत्रे उघडली. राजाने दवंडी दिल्याने अनेक भिक्षुक आले. फुकटचे खाऊन आळशी झाले. या भिक्षुकांना काही ज्ञान नव्हते, हे पाहून राजाने त्यांना हरभरे भरडण्याच्या कामास जुंपले. मुकुंदराज योगसाधनेमुळे काशीत गेले होते. ते परत आल्यानंतर राजाने त्यांना, ''आपल्याला सिद्धी मिळवून द्यावी; नाहीतर तुझी अवस्थाही इतर साधूंप्रमाणे होईल'', असा निरोप पाठवला. मुकुंदराज राजाकडे गेले. ''तू दुष्ट आहेस. सर्व साधूंना तू मुक्त कर ! त्या सर्वांचे काम मी एकटा करून देतो'', असे ते म्हणाले. राजाने भलेमोठे जाते मागवले. त्यातील मुखात हरभरे भरून टाकले. मुकुंदराजांनी जात्याच्या खुंट्याला आपल्या हातातील छडीने स्पर्श केला, तेव्हा जाते आपोआप फिरू लागले. मंदिराच्या मागील भागात हे जाते आहे. राजा मुकुंदराजांना शरण गेला. त्याला वेदांतशास्त्राचे सार असलेला ग्रंथ मुकुंदराजांनी सांगितला. हा ग्रंथ त्यांनी काशी येथे लिहिला, असे 'योगेश्वरी माहात्म्य' या ग्रंथात म्हटलेले आहे. प्रत्यक्ष ग्रंथाच्या शेवटी मुकुंदराजांनी नोंदलेला तपशील या

ग्रंथातील माहितीशी जुळत नाही.

**''नृसिंहाचा बल्लाळ। तयाचा कुमरू जैत्रपाळ। तेणे करविला गदारोळ। ग्रंथरचनेचा ॥''**

तसेच,

**''शके अकराशे दाहोत्तर। साधारण नाम संवत्सर। तैं राजा शार्ङ्धर। ग्रंथ उभार तैं जाला॥ ऐसा समयो सर्वोत्तम। तेथे मुकुंद द्विजोत्तम। विवेकसिंधु ग्रंथ मनोरम। निर्मिता जाला॥''**

असा उल्लेख ग्रंथाच्या शेवटी आहे. मुकुंदराजांनी समाधी घेतली ते स्थान डोंगराच्या कुशीत आहे. तेथे जाण्यासाठी शंभर-सव्वाशे पायऱ्या उतरून खाली जावे लागते. पावसाळ्यात डोंगराभोवती असलेली हिरवळ आणि डोंगरातून ओघळणारे जलप्रवाह फारच सुंदर दिसतात. मार्गशीर्ष वद्य त्रयोदशीस येथे उत्सव असतो.

## सर्वज्ञ दासोपंतांची कर्मभूमी

दासो दिगंबर देशमुख यांचा जन्म भाद्रपद वद्य ८ शके १४७३ रोजी झाला. त्यांचे वडील बीदरच्या राजाचे कारभारी होते. नारायण पेठ येथील दुष्काळात त्यांनी सरकारी कोठारातील धान्य लोकांना वाटले म्हणून बादशहाने त्यांना एक महिन्यात धान्याची रक्कम भरण्याची आज्ञा केली आणि दासोपंतांना ओलीस ठेवले. एक महिन्यात सरकारी रक्कम भरली नाही तर दासोपंतांना मुसलमान केले जाईल, असे राजाने सांगितले होते. एक महिना मुदतीपूर्वीच एका माणसाने राजाला रक्कम दिली. त्यामुळे दासोपंतांची सुटका झाली. रक्कम भरणारा माणूस म्हणजे दत्तात्रयाने घेतलेले रूप होते, अशी कथा आहे.

दासोपंत अंबेजोगाईस आले तेव्हा सीतोपंत देशपांडे यांनी त्यांची सर्व व्यवस्था केली आणि त्यांना आपले गुरु केले. दासोपंत आनंद संप्रदायातील दत्तोपासक होते. या संप्रदायात ''आनंद दत्तात्रय देवदेव'' अशी घोषणा आहे. दासोपंतांनी माघ वद्य षष्ठी शके १५३७ रोजी समाधी घेतली. दासोपंतांनी दत्तोपासनेची व्यवस्थित मांडणी केली. त्याप्रमाणे आजही उपासना सुरू आहे. सध्या दासोपंतांच्या वंशजांची चौदावी पिढी असून त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या वाटणीनुसार येथे दोन मंदिरे आहेत. थोरले देवघर येथे पंचधातूची एकमुखी दत्तमूर्ती आहे. धाकटे देवघर येथे दासोपंतांना राक्षसभुवन येथील गोदावरीच्या वाळवंटात सापडलेल्या दत्तात्रयाच्या पादुका आहेत.

## दासोपंतांची प्रचंड ग्रंथसंपदा

दासोपंतांनी संस्कृत आणि मराठी भाषेत ५३ ग्रंथ लिहिले. 'गीतार्णव' आणि 'पदार्णव' या ग्रंथांतील ओवीसंख्या प्रत्येकी सव्वा लक्ष आहे. त्यांची स्फुटरचनाही विपुल आहे. त्यांना दररोज निजामी राजवटीत असलेल्या ढबू पैशाची शाई लिहिण्यासाठी लागत असे. दासोपंतांनी केलेली सर्व रचना आपल्या प्रज्ञेने केलेली असून **''न पाहे श्रोतेयांचे वदन। न करी भाष्याधारे विवरण''**, असे म्हटलेले आहे. दासोपंतांनी पांढऱ्या कपड्यावर वेदांतविषयक 'पंचीकरण' हा ग्रंथ लिहिला. तो 'दासोपंतांची पासोडी' म्हणून प्रसिद्ध आहे. चार फूट रुंद आणि चाळीस फूट लांबीच्या कापडावर अनेक चित्रे, आकृत्या असलेला सोळाशे ओव्यांचा हा ग्रंथ न. शे. पोहनेरकर यांनी संपादन करून मराठवाडा साहित्य परिषदेमार्फत प्रसिद्ध केला.

निजमाच्या राज्यात मुलांना मातृभाषेत शिक्षण घेता यावे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९३५ साली योगेश्वरी शिक्षण संस्था काढली. या संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या राष्ट्रीय शिक्षणामुळे अंबेजोगाई येथे हैदराबाद मुक्ती संग्रामात लढणाऱ्या वीर तरुणांची फौज निर्माण झाली. स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख केंद्र म्हणून या शहरास ऐतिहासिक महत्त्व आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केंद्र मानणारे मराठवाड्यातील शैक्षणिक शहर असा या नगरीचा लौकिक आहे.

फ्लॅट क्र. ४, सागर प्लाझा,
ज्योतीनगर, औरंगाबाद.

❑❑❑

# ।। ऐसा महिमा पंढरीचा ।।

• विद्याधर ताठे •



**'भूवैकुंठ', 'संतांचे माहेर', 'सुखाची मांदुस', 'विवेकांची पेठ', 'आनंदाची ओवरी', प्रेमाचा हाट' अशा अनेकविध विशेषणांनी मराठी संतांनी पंढरीनगरीचा अनंत - अगाध महिमा वर्णन केलेला आहे. अनेक संतांच्या अभंगगाण्यांमध्ये पंढरीमाहात्म्यपर कित्येक अभंग आहेत आणि एवढे गुणवर्णन करूनही समाधान न झाल्याने संत शिरोमणी नामदेव म्हणतात - ''पंढरीचा महिमा वर्णावा किती ?'' पंढरीनिवासी विद्याधर ताठे यांनी शब्दांकित केलेला पंढरीचा महिमा - ''शिरडी माझे पंढरपूर'' या आरतीच्या ओळीत शिरडीला पंढरपूर म्हणून गौरविले जाते, त्या पंढरीबद्दल -**

**युगा अठ्ठाविसांवरी । आहे पुंडलिकाच्या द्वारी ।**
**विठ्ठल उभा भीमातीरी । विश्व तारी दर्शने ।।**

संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी वरील एका चरणामध्ये पंढरीची सारी गुणवैशिष्ट्ये आपणास सांगितलेली आहेत. या एका अभंगचरणात पंढरीचे प्राचीनपण सांगितलेले आहे, पुंडलिकाचे मोठेपण सांगितलेले आहे, विठ्ठलाचे स्वरूप वर्णन केलेले आहे, आणि केवळ दर्शनाने हा विठ्ठल विश्व तारतो, हे त्याचे वैशिष्ट्यही कथन केलेले आहे. भारतवर्षामध्ये अनेक तीर्थे, क्षेत्रे आणि देवता आहेत, पण पंढरीसारखे दुसरे स्थान नाही. कारण काही ठिकाणें 'तीर्थ' म्हणून प्रसिद्ध आहेत, काही 'क्षेत्र' म्हणून परमपावन आहेत, तर काही 'दैवतस्थान' म्हणून ख्यातकीर्त झालेली आहेत, पण पंढरी **हे असे अद्वितीय अनुपम ठिकाण आहे की इथे 'तीर्थ, क्षेत्र आणि दैवत' या तिन्हींचा संगम घडलेला आहे,** म्हणून संतजन म्हणतात -

**पृथ्वीवरी तीर्थे आहेत अपार ।**
**परी पंढरीची सर एका नाही ।।**

## अनंत तीर्थांचे माहेर

श्री क्षेत्र पंढरीचे विविध संतांनी आपल्या अभंगवाणीत वर्णन केलेले आहे. मराठी संतसाहित्यातील पंढरीनगरीचे भक्तिभावाने भारलेले वर्णन क्वचितच अन्य एखाद्या भाषेत एखाद्या क्षेत्राबद्दल असेल. पंढरीचे भाग्यच काही विलक्षण आहे. साधुसंतांनी साहित्यातील विविध अनुपम विशेषणांनी या नगरीचा महिमा गायलेला आहे आणि **'संतांचे माहेर' - 'अनंत तीर्थांचे माहेर'**, असा सर्वोच्च बहुमान दिला आहे. 'माहेर' या शब्दामागे भावभावनांचा - स्नेहबंधांचा जो गहन आशय आहे तो केवळ स्त्रीमनालाच समजू शकतो. अशा भावात्म भक्तिबंधाने भारून संतांनी पंढरीला आपले माहेर म्हटलेले आहे.

**१) अनंत तीर्थांचे माहेर।**
**अनंत रूपांचे हे सार॥**
**अनंता अनंत अपार।**
**तो हा कटी कर ठेऊनि उभा॥**
**२) ऐसे सकल तीर्थांचे माहेर।**
**तीर्थ नाही यापरते थोर॥**

संतांनी पंढरीची इतर तीर्थक्षेत्रांशी तुलना करून तिच्या माहात्म्याचे पवाडे गायलेले आहेत. उत्तर भारतातील वाराणसी व महाराष्ट्रातील नाशिक या दोन प्रमुख क्षेत्रांशी तुलना आपणास पुढील अभंगचरणात दिसून येते -

**वाराणसी चालिजे मास।**
**गोदावरी एक दिवस।**
**पंढरी पाऊल परियेसा।**
**ऐसा ठसा नामाचा॥**

वाराणशीत एक महिना व गोदावरीकाठी एका दिवसात जेव्हढे फळ मिळते तेव्हढे केवळ पंढरीच्या वाटेवर एक पाऊल टाकल्यावर प्राप्त होते. वाराणसी क्षेत्र शिवशंकराच्या त्रिशूळावर वसलेले आहे, तर पंढरी क्षेत्र भगवान विष्णूंच्या सुदर्शन चक्रावर वसलेले आहे, अशी संतांची धारणा आहे -

**१) वाराणसी त्रिशुलावरी।**
**पंढरी सुदर्शनावरी॥**
**२) भूमी ते राहिली विष्णूचक्रावरी।**
**वैकुंठीची परी सर्व येथे॥**

पंढरीचा महिमा स्वत: कैलासराणा भगवान शंकरांनी देवी पार्वती व स्कंद यांना सांगितलेला आहे. ब्रह्मादिकांना पंढरीचा महिमा वर्णन करणे शक्य झालेले नाही.

**कैलासीचा राणा।**
**गिरीजा, स्कंदा सांगे महिमा॥**

म्हणूनच संतांनी **"धन्य ती पंढरी। धन्य भीमातीर।"** असे धन्यतेचे उद्गार काढलेले आहेत.

## विठ्ठल देवतेचे वेगळेपण

श्री क्षेत्र पंढरीचे श्री पांडुरंग तथा 'श्री विठ्ठल' हे दैवत ! भारतातील असंख्य देवदेवतांमध्ये श्री विठ्ठलाचे आगळेपण काही न्यारेच आहे. हे वेगळेपण दृश्य स्वरूपात आहे, तद्वतच ते भावात्म आहे. म्हणूनच, **"ऐसे तीर्थ दाखवा कोठे ?"** असा विनम्र पण ठाम दावा संतांनी केलेला आहे. आपण अनेक वेळा पंढरीस जातो व घाईगर्दीत परततो. तेथील वैशिष्ट्यपूर्णतेचा, वेगळेपणाचा स्वस्थ चित्ताने वेध घेण्यास आपणास वेळच नसतो. **"तुज जाणावया जाय देवा"**, संत ज्ञानेश्वर पंढरीदर्शनाचा - पंढरीवारीचा असा उद्देश सांगतात. आपण अशी वारी करतो का ? असो. आपण पंढरीमाहात्म्याची काही वैशिष्ट्ये पाहू !

१) सर्वात महत्त्वाचे म्हणजे विठ्ठलाचे वेगळेपण. श्री विठ्ठल या ठिकाणी आला तोच भक्त पुंडलिकाच्या मातृपितृभक्तीला भाळून. मातृपितृभक्तीच्या गौरवासाठी श्री विठ्ठलाचे पंढरीस येणे हेच त्याचे पहिले वेगळेपण आहे.

२) पंढरपुरातील देव - श्री विठ्ठल भक्तांना उराउरी भेटतो. देव-भक्तांची अशी दर्शनभेट जगाच्या पाठीवर केवळ पंढरपुरातच दिसून येते. अन्य सर्वत्र मुख्य गाभाऱ्याच्या बाहेरून १०-१५ फुटांवरून देवाचे दर्शन करावे लागते. इथे देव व भक्तांमध्ये प्रेमाचे नाते आहे. म्हणून भक्त इथे देवाला आपला **'प्रेमसखा'** म्हणतो.

**माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव।**
**आपणचि देव होय गुरु॥**

संत नामदेव महाराजांच्या घरात धुणीभांडी करणारी दासी जनी श्री विठोबास आपला **'प्राणसखा'**, **'प्रेमसखा'** म्हणते. ही व अशी देव-भक्तांची जिव्हाळ्याची जवळीकता क्वचितच अन्यत्र दिसून येईल. देव-भक्तांची ही प्रेमळ जवळीकता हेच पंढरीचे माहात्म्य आहे.

३) तिसरे वैशिष्ट्य म्हणजे इतर धर्मपंथांमध्ये भक्त देवाकडे भीतीने धाव घेतो. देव भक्तास आज्ञापालन करण्यास सांगतो. काही ठिकाणी भक्त नवसाने जातो. लौकिकप्राप्तीसाठी जातो. गरजेपोटी - विवशतेपोटी जातो. पंढरी त्यास अपवाद आहे. इथे देव-भक्तांमध्ये प्रेमाचे जिव्हाळ्याचे नाते आहे. इथे विठ्ठल भक्तांची वाट पाहतो आहे, त्यांच्या भेटीसाठी व्याकूळ होतो, भक्तांना पालवितो आहे. असा भक्तांना भेटीची साद घालणारा देव जगाच्या पाठीवर केवळ पंढरीचा पांडुरंगच आहे.

**१) आषाढी - कार्तिकी विसरू नका मज।**
**सांगतसे गूज पांडुरंग॥**
**२) विठ्ठलराज भीमातीरी।**
**वाट पाहे भक्ताची॥**
**३) वाट पाहे उभा**
**भेटीची आवडी।**
**४) विठो पालवित आहे।**

संतवाणीतील वरील अभंगवचने पंढरीचे यथार्थ मोठेपण व्यक्त करणारी आहेत.

४) इतर तीर्थक्षेत्री व देवदेवतांकडे जाणाऱ्या भक्तांपेक्षा पंढरीस जाणारा भक्त काहीसा वेगळा आहे. पंढरीस जाणारा भक्त हा **'वारकरी'** नावाने ओळखला जातो. कारण तो विशिष्ट नियमाने ठरलेल्या वेळी, ठरलेल्या पद्धतीने पंढरीची वारी करीत असतो. वारी करणे म्हणजे नियमितपणे पंढरीस जाणे. असा नियमितपणा अन्यत्र दिसत नाही. वारीचा नियमितपणा हाच वारकऱ्यांचा निष्ठाभाव होतो. इतर देवदेवतांकडे भक्त पुत्र - धन - संपत्ती मागतात, तर पंढरीचा वारकरी पांडुरंगाला विनवितो -

**१) पंढरीची वारी।**
**कधीं चुकू न दे हरी।**
**२) हेचि घडो मज जन्मजन्मांतरी।**
**मागणे श्रीहरी नाही दुजे॥**

विठ्ठलाच्या भक्तिरंगातील आनंदस्थिती हेच वारकऱ्याचे परमश्रेष्ठ असे सुख आहे. त्या सुखापुढे मोक्ष, वैकुंठवास, इंद्रपद तुच्छ आहे.

## सकळासी येथे आहे अधिकार

पंढरीचे हे भक्तिपीठ म्हणजे मुक्तद्वार आहे. लहानथोर, आबालवृद्ध, गरीब-श्रीमंत, ब्राह्मण-अंत्यज, ज्ञानी-अज्ञानी असा इथे भेदाभेद नाही. **''या रे या रे अवघेजन।''** म्हणत संतांनी सकल समाजाला हाळी घातलेली आहे. आपल्या वर्णाभिमानाला, जातीभिमानाला तिलांजली देऊन साऱ्या वर्णांचे, अवघ्या जातीपातीचे लोक पंढरीचे वारकरी होतात. इथे जाती व वर्ण अप्रमाण आहेत, असे खुद्द ज्ञानदेवांनीच सर्वांना आश्वासन दिलेले आहे आणि पारमार्थिक समतेची धर्मध्वजा - पताका चंद्रभागेच्या वाळवंटात रोवलेली आहे. इथे जनाबाई दासी नाही, चोखामेळा महार नाही, एकनाथ ब्राह्मण नाहीत, नरहरी सोनार नाही, सावता माळी नाही. इथे ते सर्वजण फक्त वारकरी आहेत. **''भेदाभेद भ्रम अमंगळ''**, असे ज्ञानदेव - तुकोबांचे केवळ तत्त्वज्ञान नाही, तर आचार आहे. ज्ञानदेवांच्या अशा आचारामुळेच अठरापगड जातींतील संतांची त्यांच्याभोवती मांदियाळी जमली.

**''सकळासी येथे आहे अधिकार''**, अशी जगद्गुरु संत तुकोबाराय यांची ग्वाही सर्वपरिचित आहे. इथे कर्मकांडाला स्थान नाही, यज्ञाला मान नाही, योगाला महत्त्व नाही, ज्ञानाचे स्तोम नाही. इथे केवळ नाम - भक्तीलाच स्थान - मान व महत्त्व आहे. नाम हेच येथील अधिष्ठान आहे. म्हणून पंढरीचा महिमा म्हणजे नाम-

महिमाच होय ! यज्ञ व कर्मकांडाला स्थान नसल्याने ना पुरोहिताची गरज, ना विधी-विधानाची जरूरी. इथे देव-भक्तांची थेट भेट आहे. नाम हेच एकमेव भेटीचे स्थान आहे. म्हणूनच पंढरीच्या वारकऱ्याला **'नामधारक'** असेही म्हटले जाते.

**एका जनार्दनी नाम । गाता निरसे भवभ्रम ।**
**साधन उत्तम । कलियुगी ।।**

अशाप्रकारे कलियुगात यज्ञयाग, योग नव्हे, तर नाम हेच श्रेयस्कर व सुलभ साधन आहे. वारकरी संतांनी सकल समाजास विश्वासाने जवळ घेत पटवून दिले, यज्ञासाठी ठराविक वर्णाची - योगासाठी पात्रतेची - दानासाठी समृद्धीची गरज असते, पण 'नाम' अशी गोष्ट आहे की, त्यासाठी कशाचीच पूर्व अट नाही. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात - **''सकळासी येथे आहे अधिकार.''** नामासाठी ना संसारत्यागाची गरज आहे, ना दैनंदिन काम सोडण्याची गरज आहे. हाताने काम करीत असतानाच मुखाने देवाचे नाम घ्या. आपणास प्राप्त झालेले कर्म करणे हीच ईश्वरभक्ती आहे, अशी स्वकर्मनिष्ठा निर्माण करीत संतांनी सहज - सोप्या नामभक्तीचा प्रचार व प्रसार केला. **''नामे तिन्ही लोक उद्धरती''**, असे सांगत संत ज्ञानदेवांनी नाममाहात्म्य प्रतिपादिले आहे. शूद्रदेवता-पूजन, नवससायास, बळीबकरे, कर्मकांड यांचे उच्चाटन करून पंढरीच्या संतांनी निष्काम भक्ती व नामस्मरणाधिष्ठित भक्तिपंथ प्रवाहित केला, हाच पंढरीचा खरा महिमा होय !

अशाप्रकारे पंढरीचा महिमा वर्णावा तेव्हढा थोडा आहे. म्हणूनच संत नामदेव म्हणतात - **ऐसा पंढरीचा महिमा । काय वर्णू म्हणे नामा ।।** नामदेवशिष्या जनाबाई तर चक्क पांडुरंगालाच पंढरीचा महिमा विचारते.

**जनी म्हणे पांडुरंगा । माझ्या जीवीच्या जीवलगा ।**
**विनविते सांगा । महिमा पंढरीचा ।।१।।**
**कैसी बसविली पंढरी । काय महिमा भीमातीरी ।**
**पुंडलिकाद्वारी । का उभा राहिलासी ।।२।।**

पंढरीचा महिमा कळण्यासाठी एकच उपाय आहे, तो म्हणजे पंढरीची वारी करणे. कारण काही गोष्टी शब्दगोचर नसतात. त्या अनुभवायच्या असतात. म्हणूनच संतांनी म्हटले आहे की -

**सुखालागी करिसी तळमळ**
**तरी तू पंढरीसी जाय एकवेळ ।**


**होय होय रे वारकरी ।**
**पाहे पाहे रे पंढरी ।।**

●●●



**पंढरींत विठ्ठल रखुमाई । यांच्या दर्शनीं जी नवलाई । तेंचि विठ्ठलदर्शन देई । बाबा साई शिरडींत ।। आज्ञा एकदां दासगणूला । नामसप्ताह मांडावयाला । होतां गणुदास वदती तयांला । विठ्ठल प्रकटला पाहिजे ।। बाबा तंव छातीस हात लाविती । दासगणूसी निक्षूनि वदती । ''हो हो प्रकटेल विठ्ठलमूर्ति । भक्त भावार्थी पाहिजे ।। डाकुरनाथाची डंकपुरी । अथवा विठ्ठलरायाची पंढरी । ती हीच रणछोड द्वारकानगरी । जाणें न दूरी पहावया ।। विठ्ठल काय एकांतींचा उठून । येणार आहे दुसरा कुठून । भक्तप्रेमें उत्कटून । एथेंही प्रकटून राहील ।। पुंडलिकें वडिलांची सेवा । करूनि भुलविलें देवाधिदेवा । पुंडलिकाच्या त्या भक्तिभावा । विटे विसांवा घेतला'' ।। असो होतां सप्ताहाची समाप्ति । झाली म्हणती दासगणूप्रती । शिरडीस विठ्ठलदर्शनप्राप्ती । ही घ्या प्रतीति बाबांची ।।**

**- अ. ४, श्री साईसच्चरित**



डॉ. कुमुद गोसावी

'श्री पैठण' ही नाथांची जन्मभूमी अन् कर्मभूमीही. ती प्राचीन 'प्रतिष्ठान' नगरी 'दक्षिण काशी' म्हणूनही ओळखली जाई. दक्षिण गंगा गोदाकाठी ही नगरी सुमारे चार हजार वर्षांपूर्वी वसलेली. गोदा संस्कृतीच्या जडण-घडणीत हिचा सिंहाचा वाटा. तिला पूर्वी 'ब्रह्मपुरी' म्हणत. ब्रह्मदेवानं इथंच गोदातीरी तप केल्यानंतर पुढं ही भूमी विद्येचं, विद्वानांचं माहेरघर म्हणून भारतात नावाजली. इथं



श्री संत एकनाथ, विजयी पांडुरंग आणि नाथ समाधी मंदिर

जैन, बौद्ध, महानुभाव, मुस्लिम, हिंदू यांनी आपापली धर्मकेंद्रं स्थापिली.

या पावन भूमीवर शककर्त्या शालिवाहनापासून ते हैद्राबादच्या निजामापर्यंत अनेक राजवटींनी राज्य केलं. राजकीय, धार्मिक, आर्थिक अन् ऐतिहासिक या क्षेत्रांत या भूमीला उज्ज्वल पार्श्वभूमी आहे. या नगरीचा परदेशांतही अतिशय सन्मानानं पूर्वी उल्लेख होत असे. अनेक परकीय प्रवाशांनी केलेल्या प्रवासवर्णनांतून 'पैठण'चा निर्देश आहे. प्राचीन साहित्यात तर पैठणला पट्टण, पइट्ठान पोतली, पोयणपूर या नावांनी संबोधलं जाई; अन् रहिवाशांना 'पेतनिक' वा 'पैठणिक' म्हणत.

**एकेकाळचे श्री क्षेत्र प्रतिष्ठान, म्हणजेच संत एकनाथांच्या लीलांनी पावन झालेले आजचे 'पैठण' होय ! जैन-बौद्ध-हिंदू-सूफी मुसलमान या सर्वांनाच ही नगरी आपली वाटते. संत एकनाथांमुळे या नगरीचा नावलौकिक अधिकच वाढला. या पैठण नगरीचा ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक वैभव आणि धार्मिक महिमा अपूर्व आहे.**

पूर्वी हा पैठण परिसर दंडकारण्याचा भाग होता, असं म्हणतात. आज महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील गोदेच्या उत्तर तीरावरील या पैठणचा सर्वात जुना उल्लेख 'सुत्तनिपात' या ग्रंथात आढळतो तो 'पोतण' नगर या नावानं. यात ते अश्मक देशाची राजधानी असल्याचं म्हटलं

आहे. 'पैठणिक' म्हणून इथल्या नागरिकांचा सम्राट अशोकाच्या शिलालेखातही निर्देश आहे. रांची येथील स्तुपावरील कोरीव लेखातही पैठणिकांचे उल्लेख आहेत. इ. स.च्या आधीपासून व्यापारउदीमाच्या निमित्तानं व्यापारी वर्ग देश-देशांतरी संचार करीत असल्याची साक्ष देणारे उल्लेख पैठणचे प्राचीनत्व, ऐतिहासिक महत्त्व सांगून जातात.

## वैभवी वारसा

या नगरीचा ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक वैभव आणि धार्मिक महिमा अपूर्व आहे. इसवी सन पूर्व ६व्या शतकापासून पैठणचा इतिहास उपलब्ध आहे. अनेक चांगल्या-वाईट घटना-प्रसंगांनी तो युक्त आहे. शालिवाहनाच्या काळात या नगरीनं सुवर्णनगरीचं वैभव पाहिलं, तर तिला यादव काळात 'दक्षिण काशी' म्हणून गौरविलं गेलं. सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या कालखंडानंतर पैठण जैन धर्माचं मुख्य केंद्र बनलं. मराठवाड्यातील प्रमुख दिगंबर जैन केंद्रांपैकी हे सर्वात प्राचीन केंद्र.

उत्तर चालुक्य कालखंडाची साक्ष देणारी भगवान नृसिंहाची अत्यंत लक्षणीय मूर्ती, काळभैरवाची मूर्ती म्हणजे इथलं वैभवच. या काळभैरवाच्या मूर्तीत शिव, विष्णू व यम या देवतांचं दर्शन होतं. यातील प्रमुख मूर्ती विष्णूची असून तिच्या ललाटी शिवाचं उग्ररूप आहे. त्यामुळं या मूर्तीला 'काळभैरव' म्हणतात. काशीचं प्रमुख दैवत असलेला काळभैरव इथं दक्षिण काशीतही विसावलाय.

नवीन धर्माचा उदय अन् परकीय आक्रमणांचा लोंढा या दोन घटनांच्या संदर्भात पैठणला उदयाला आलेल्या सातवाहनांनी आपल्या विलक्षण सामर्थ्यानिशी इतिहासाला अपूर्वी कलाटणी देऊन नवचैतन्य प्रगट केलं. प्रबळ राजकीय इच्छाशक्तीला प्रखर कृतीची जोड देण्याची त्यांची प्रतिभाशक्ती भारतीय इतिहासावर प्रभाव पाडण्यास पोषक ठरली. त्यांच्या कुशल राज्यकारभारानं अन् ऐक्यभावामुळे सामाजिक समरसता, सांस्कृतिक ऐक्यभाव अन् आर्थिक स्थैर्य जोपासलं गेलं. त्यामुळे तत्कालीन जगतात त्यांचा नावलौकिक झाला. भारतीय उत्पादनाला जगात प्रथम श्रेणीची प्रतिष्ठा लाभली; अन् भारताकडे आर्थिक संपत्तीचा ओघ सुरू झाला. आर्थिक समृद्धी, स्थापत्य, कला, वाङ्मय, लोकवाङ्मय सर्वच दृष्टीनं हा काळ सुवर्णकाळ ठरला. या सातवाहन काळातील संस्कृतीचे दर्शनी अंशात्मक पुरावे पैठणला झालेल्या उत्खननातून हाती आलेल्या मौलिक वस्तू देऊन जातात.

## लोकसाहित्याची साक्ष

सातवाहन काळात संस्कृत व प्राकृत भाषांतून साहित्य निर्माण झालं. त्याला बौद्ध व जैन वाङ्मयाचीही जोड दिली गेली. जैन वाङ्मयातील कालकाचार्य कथानक, बृहत्‌कथासूत्र भाष्य, कल्पप्रदीप आदिंचा निर्देश, बौद्ध पंडित नागार्जुनाचा विशेष अभ्यास, सातवाहनांचा पहिला सम्राट हाल यानं लिहिलेली 'गाथा सप्तशती', गुणाढ्याचा बृहत्‌कथाकोष, क्षेमेंद्राची कथामंजरी आदि ग्रंथवाङ्मय लोकवाङ्मयाची साक्ष देऊन जातात. हालाच्या गाथेतून अन् गुणाढ्याच्या बृहत्‌कथेतून लोकसंस्कृतीचं दर्शन घडतं.

## सांस्कृतिक ठेवा

प्राकृतातील 'प्रतिष्ठान चरित्र' या ग्रंथातून प्रतिष्ठान नगरीचं वैभव चित्रित झालं आहे. 'प्रबंध चिंतामणी' या जैन साहित्यातूनही पैठणचा वैभवशाली इतिहास पहायला मिळतो.

खरं तर सातवाहनकालीन लोकसाहित्याचा अभ्यासही नवीन दृष्टीनं व्हायला हवा. नवीन महाराष्ट्राच्या घडणीतही त्याचा उपयोग होऊ शकतो. सामाजिक समन्वय व समरसतेमुळे महाराष्ट्रात जे चैतन्यमयी चित्र निर्माण झालं होतं ते आजही प्रेरणादायी ठरू शकतं. शेती, व्यापार, उद्योगधंदे, स्थापत्य, कला, शिल्प आदि क्षेत्रांत पैठणनं केलेली विक्रमी प्रगती केवळ आठवून, तिचे गोडवे गाऊन न थांबता तो काळ पुन्हा यावा यासाठी सर्वार्थानं प्रयत्न व्हावेत.

गुणाढ्याची बृहत्कथा ही तत्कालीन समाजजीवनच चितारून जात नाही, तर समाजाला बहुश्रुत करण्यासाठी कथावाङ्मयाचा कल्पकतेनं कसा उपयोग होतो, हेही सिद्ध करते.

पैठणचा इतिहास अभ्यासताना हजार वर्षांनंतरही सोमदेवाला गुणाढ्यांच्या विचारांचा कालानुरूप परिपोष करावासा वाटला. धर्म कधीही विपरीत असू शकत नाही. चारित्र्य हेच विद्वानांचं धन आहे, हे मोलाचं सूत्र त्यानं त्याआधारे मांडलं; ते अत्यंत अर्थपूर्ण असंच आहे. महाराष्ट्रातील प्रतिभेची ही सोनेरी पहाट आजही साद घालणारीच नव्हे काय ?

शालिवाहनांनी पैठणची भूमी राजधानी म्हणून तर गौरवलीच; त्याचबरोबर विद्या, कला, उद्योग आदि अनेक क्षेत्रांनी तिला समृद्ध केलं. इ. स. पूर्व २२० ते इ. स. २१८ अशी या राजघराण्याची कारकीर्द आहे. या काळातील अनेक शिल्पाकृती आजही तत्कालीन वैभवाची साक्ष देतात.

मोगलांनी पुढं देवगिरीला राजधानी थाटल्यानं पैठणचं रूप पालटलं. रामदेवराव यादवांच्या काळात धर्मक्षेत्र म्हणून ही नगरी महत्त्व पावली. वेदाभ्यासी, धर्मशास्त्र जाणणारी विद्वान मंडळी इथं असल्यानंच संत ज्ञानेश्वरादि भावंडांना शुद्धिपत्र मिळविण्यासाठी पैठणला नागघाटावर धाव घ्यावी लागली. रेड्यामुखी वेद वदवून आपल्या सामर्थ्याची ओळख पैठणकरांना करून द्यावी लागली.


महानुभाव संप्रदायाचे संस्थापक चक्रधरस्वामी सिंहस्थ यात्रेला जाताना पैठणला थांबले होते. तेव्हा त्यांच्या शिष्या बोणेबाई त्यांना म्हणाल्या,

''वा मुनिदेया ! हे थोर नगर; एथ तुम्ही चुकाल.''

यावरून पैठण हे किती मोठं शहर होतं, याची कल्पना येते. या भूमीवरच या मुक्कामात नागांबिकेला चक्रधरस्वामींच्या देवत्वाचा साक्षात्कार झाला. स्वामी शहराच्या दक्षिणेला गोदाकाठी जिथं वसतीला होते तिथंच असलेलं दत्तमंदिर आजही 'महानुभाव संप्रदायाचं आद्यपीठ' मानलं जातं. स्वामींच्या सामर्थ्य-साक्षात्कार-स्थळीही १९८७ साली मंदिर बांधलं गेलं. 'स्थानपोथी' या महानुभावीय ग्रंथातून या स्थानाची माहिती आलेली आहे.

यादवसत्ता १३१२ साली संपुष्टात आल्यावर अन् मोगल राजवट सुरू झाल्यावर इस्लाम धर्मप्रचारासाठी उत्तरेतून दक्षिणेत आलेल्या सूफी संतांतून हजरत मौलाना मोइउद्दिन १४५३ साली पैठणला आले. 'मौलानांचा दर्गा' देखील पैठणचं भूषण आहे. ते सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान आहे. पुढं १५१६ साली 'सिस्तान'च्या निजामुद्दिन बादशहालाही धर्मप्रसारासाठी पैठणला यावंसं वाटलं. त्याचा दर्गा 'सय्यद सादात दर्गा' या नावानं ओळखला जातो. तिथं 'कुराण शरीफ' या ग्रंथाची प्रत जतन करण्यात आली आहे.

## विजयस्तंभ तीर्थखांब



पैठणचा प्राचीन 'तीर्थखांब' वा 'विजयस्तंभ' व श्री संत एकनाथ महाराज

शालिवाहन राजांनी हा स्तंभ उभारून पैठणच्या भूमीवर घडलेल्या सर्व घटना-प्रसंगांचा अक्षय साक्षी ठेवला आहे. प्राचीन शिल्पाकृतीचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. या स्तंभासंदर्भात अनेक दंतकथा आहेत. सर्व तीर्थांचं दर्शन घेतल्यानंतर याचं दर्शन घ्यावं, अशी प्राचीन परंपरा आहे. हा दगडी खांबही या पैठणभूमीचं आगळं-वेगळं वैभव ठरावं एवढा तो देखणा आहे.

## संत एकनाथांचं पैठण

पैठणची भूमी जशी शककर्त्या शालिवाहनांची समरभूमी, बाहुबली नृपाची कर्मभूमी, तशी संत एकनाथ महाराज यांनी केलेल्या युगसंजीवक कार्यानं पुनीत झालेली भूमी आज 'नाथांचं पैठण' या नावानं नावाजली आहे. महाराष्ट्रातील धार्मिक व सांस्कृतिक केंद्र म्हणून तिला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

संत भानुदास महाराजांनी - नाथांच्या पणजोबांनी विजयनगरच्या राजानं कर्नाटकात नेलेली पांडुरंगाची मूर्ती पंढरपुरला परत आणली, वारकऱ्यांचं लाडकं दैवत त्यांना पुनश्च भेटवून इतिहास घडवला, तो या भूमीतील भक्तिसामर्थ्याची स्फुल्लिंग अंतरी चेतवीत ठेवूनच. त्यांनी नाथमनात बालपणीच भक्तिज्ञानज्योत प्रज्वलित केली. सद्गुरु जनार्दनस्वामींची अतीव ओढ लागून पैठणच्या भूमीला त्रिवार वंदन करून धूलीकणांच्या रूपानं तिला सोबत घेऊन नाथपावले देवगिरीकडे वळली.

निस्सीम गुरुभक्ती, गुरुसेवा, शूलभंजन पर्वतावर सद्गुरुकृपेनं घडलेलं साक्षात् श्री दत्ताचं दर्शन, निर्विकल्प समाधी लागेपर्यंत झालेली साधना, आधी सद्गुरुसमवेत अन् नंतर एकट्यानं केलेली तीर्थयात्रा, त्यातून घडलेलं लोकदर्शन, लोकस्थितीची दारुणता हे सारं सारं घडूनही पैठणच्या भूमीनं नाथांना पुनश्च आपल्याजवळ बोलावून घेतलं. वृद्ध आजी-आजोबा चक्रपाणी महाराज अन् सरस्वतीबाई यांना नातवाच्या दीर्घकाल वियोगानंतर जसं आनंदानं आभाळ ठेंगणं झालं तसं या भूमीलाही आनंदाचं भरतं आलं. तिनं नाथांना हृदयाशी असं बिलगून ठेवलं की, इथंच त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला, साध्वी गिरिजाबाईंसह प्रपंच थाटला; अन् प्रपंचही हळूहळू परमार्थ करून सोडला. **''जे जे भेटेल भूत। ते ते मानिजे भगवंत।।''** असा सर्वसमभावाचा समाजाला महामंत्र दिला. तहानलेल्या गाढवाला गंगाजल पाजून, दारी आलेल्या भुकेल्यांना श्राधान्न खायला घालून आधी सर्वांभूती समभाव आचरणात आणला अन् नंतर लोकांना सांगितला. इथंच, या भूमीनंच त्यांना अनाथांचे नाथ केलं.

## नाथवाडा व गावातील नाथमंदिर

'नाथवाडा' तर दीनदुबळ्या जनांचा 'विसावा'च झाला होता. माणसांनी सदैव भरलेला, कथा-कीर्तन, प्रवचन, भजन, भारुडांनी रंगलेला. तिथं कुणालाही मज्जाव नव्हता.



गावातील नाथमंदिर प्रवेशद्वार

कीर्तनाला आलेल्या एका वडार जोडप्याला लोटलेल्या गर्दीतून वाट काढीत चक्क नाथांच्या शयनगृहात विसावता आलं अन् शांतिब्रह्म नाथांनी त्यांना तिथंच सुखनिद्रा देऊन दुसऱ्या दिवशी गौरवीतही केलं. गावबासारख्या भोजनप्रियाला रोज पुरणपोळी खायला घालून अंती त्याच्या शिरी कृपाहस्त ठेवून 'भावार्थ रामायण' या आपल्या अखेरच्या ग्रंथाचा उत्तरार्ध रचायला लावला. त्याला अजरामर केलं. मूळच्या मतिमंदाला, मुक्याला बोलतंही केलं. गावबासारख्यांना द्वारकेहून श्रीखंड्यारूपानं नाथाघरी येऊन साक्षात् भगवंत श्रीकृष्णानं चंदनी गंध रोज उगाळून दिलं. ती सहानखोड, पाण्याच्या कावडी वाहून आणून ज्यात रित्या केल्या तो रांजण, ज्या खांबाला टेकून कीर्तन-प्रवचनातील, भजन-भारुडातील नाथांची अमृतवाणी ऐकली तो खांब आदि सर्व खाणाखुणा या ठिकाणी पहायला मिळतात.

**कैवल्याचा पुतळा । प्रगटला भूतळा**
**चैतन्याचा जिव्हाळा । ज्ञानोबा माझा**

असं ज्ञानदेवमाउलीला अभंगरूपानं आळवत शके १५०५मध्ये नाथांनी पैठणहून आळंदीला जाऊन ज्ञानदेवांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला अन् शके १५०६मध्ये पैठणच्या पवित्र भूमीतच नाथांनी ज्ञानेश्वरी प्रतिशुद्धीचं अत्यंत अवघड परंतु अतिमहनीय संपादनकार्य केलं.

या नाथवाड्यातील देवघरात नाथांच्या पूजेतील देव आहेत. त्यांत 'विजयी पांडुरंगाची' अत्यंत चित्ताकर्षक मूर्ती "दास जेऊ घाला नं", अशा चरणांशी कोरलेल्या अक्षरांसह स्थित आहे. नाथभक्तीला भुलून हा पांडुरंगही आपणहून कर्नाटकातील एका सावकाराकडून नाथाघरी आलाय. या देवघरासमोर भव्य सभामंडप आहे. प्रवेशद्वारी मारुती व श्री दत्त यांची चित्रं आहेत. भक्ती, युक्ती अन् शक्ती या त्रिपुटींनी युक्त असा रक्षक मारुती अन् 'पासोडी'कार दासोपंत यांना प्रवेशद्वारीच दत्तदर्शन घडल्यानं ध्यानी आलेलं नाथदत्तभक्तीचं सामर्थ्य यांचं प्रतीक म्हणून श्री दत्तदेवघरासमोर दोन चौकोनी मोठे खांब आहेत. तिथं बसून नाथांचं भागवतलेखन (पंचाध्यायी) चालू असताना श्रीकृष्णानं नाथांना दर्शन दिलं अन् तो ज्या खांबात गुप्त झाला तो 'उद्धव खांब' अन् नाथ रोज ज्या खांबाशी बसून पुराण सांगत तो 'पुराण खांब' त्यांचं आजही पूजन होतं. एकनाथी भागवताची (श्रीमद्भागवतातील एकादश स्कंधावरील टीका ग्रंथ) पंचाध्यायी पैठणला पूर्ण झाल्यानंतर प्राकृतातून - मायमराठीतून भागवतलेखन केलं म्हणून उत्तर काशीत जाऊन संस्कृत पंडितांसमोर परीक्षेत उतरल्यानंतर ग्रंथसमाप्ती अन् या ग्रंथाची हत्तीवरून मिरवणूक तिथंच इतिहास घडवून गेली. मराठी सारस्वतात सुवर्णाक्षरांनी लिहावा असाच हा प्रसंग.

## काही लक्षवेधी स्थळे

प्राचीन परंपरांना छेद देऊन समाजातल्या तळागाळातील लोकांशी नाथांनी साधलेली जवळीक, त्यांचं मायमराठी भाषाप्रेम, त्यांनी चालवलेला लोकरंजनातून लोकजागर आदिंनी पैठणकर शास्त्री, पंडितांचं पित्त चांगलंच खवळलं होतं. स्वत:चा पुत्र हरिपंडित याचाही त्याला अपवाद नव्हता. कुत्सित लोक तर ज्या ओट्यावर बसून नाथनिंदा करीत तो 'कुचर ओटा'ही पैठणला आहे.

सतराव्या शतकातील मध्वमुनीश्वरांचे शिष्य 'कटाव'कार अमृतराय यांचा मठ व त्यांच्या पूजेतील देव या मठात आहेत. इथं दरवर्षी रामनवमी उत्सव साजरा होतो.

नाथभक्तिप्रेरणेनं श्रीमद्भागवताच्या दशम स्कंधावर ४२,००० प्राकृत ओव्या रचणारे 'हरिवरदा' ग्रंथकार कृष्णदयार्णव कोपर्डेकर यांचा गोदाकाठी असलेला मठ, त्यातील 'हरिवरदा' हस्तलिखित ग्रंथप्रतीतून उमटलेल्या दयार्णवांच्या कुष्ठरोगाच्या खुणा, तेथील श्रीकृष्णाची देखणी मूर्ती सारंच लक्षवेधी. या मठाच्या शेजारी असलेला नाथसंप्रदायी शिवदिन केसरी यांचा मठ तर भव्यच. आतलं लाकडी नक्षीकाम तर नजर खिळवून ठेवणारं आहे.


नागघाटाच्या वाटेवरील नाथसांप्रदायिक धोंडिनाथ महाराज यांचा दुमजली मठही लक्ष वेधून घेतो. गोदेकाठी असलेलं बारवेसारख्या आकाराचं सिद्धेश्वर मंदिर, गावाबाहेरील नाथांचं समाधीमंदिर गोदाकाठीच. नाथसमाधीमंदिराभोवती दगडी कोट आहे. इथं असलेल्या पादुकांच्या दर्शनासाठी एकनाथषष्ठी उत्सवात लाखो भाविक प्रतिवर्षी येतात. शके १५२१मध्ये नाथांनी जलसमाधी घेतलेलं कृष्णकमळ तीर्थही इथंच गोदातीरी.

पैठणची पैठणी तर जगत्‌विख्यात. एकेकाळी रोम, ग्रीस या देशांशी पैठणचा व्यापार होता. आजही ही रेशमी वस्त्रातील चांदी, सोनं या धातूंच्या तारांनी काठ, पदर विणलेली पैठणी मोठ्या दिमाखानं मिरवतेय. 'फॅशन' अन्‌ 'प्रतिष्ठा' म्हणूनही गाजतेय. पैठणची म्हणूनच ती पैठणी.

पैठणसोबत मराठवाडा विकासात मोलाचं ठरलेलं पैठणचं गोदेचं नाथसागर - जायकवाडी धरण, संत ज्ञानेश्वर उद्यान ही अलीकडील निर्मितीही पैठणचं वैभवच.

**गाव ते पैठण । पंढरपुरीच्या तांड्यात**
**जरीचं निशान । भानुदासाच्या वाड्यात**
**षष्ठीच्या दिशी । दिंडीला लागे ऊन**
**नाथांच्या वाड्यांत । भरल्या रांजणाची खूण**

अशा ओव्या एखाद्याच्या अंतरी सहज गुंजारून जातात. भानुदासऽऽऽऽ एकनाथऽऽऽऽ अशा नामगजरानं नाथषष्ठी सोहळ्यात पैठणची भूमी स्पंदित होते. महाराष्ट्र अन्‌ महाराष्ट्राबाहेरील अनेक राज्यांतून आलेल्या दिंड्यांतील लाखो लोकांची - वारकऱ्यांची पावलं पैठणची वाट चालतात. पैठणची, या नाथभूमीची धूळ ललाटी लावून धन्य होतात. इथून परततात, पुन्हा पुढील वर्षी या भूमीच्या भेटीची आस अंतरी कोंदून घेऊनच.



पैठणचं 'नाथ सागर' (जायकवाडी) धरण

समर्थ रामदासस्वामींचा

# सज्जनगड

- श्रीधर सेवक

**सह्याद्रिगिरीचा विभाग विलसे मंदारश्रृंगापरी।**
**नामे सज्जन जो नृपें वसविला श्री उर्वशीचे तिरीं॥**
**साकेताधिपती कपी भगवती हे देव ज्याचे शिरीं।**
**तेथे जागृत रामदास विलसे जो या जना उद्धरी॥**

कवी अनंत यांनी सज्जनगडाबाबत हा श्लोक लिहिला आहे. यातून सज्जनगडाचे यथार्थ रूप स्पष्ट होते. ही प्राचीन अशी तपोभूमी आहे. शिवाजीराजांनी हा गड विजापूरकरांकडून जिंकला होता. सद्गुरु समर्थांचे वास्तव्य चाफळ येथे व भ्रमण परळी खोऱ्यात असे. शिवराज्याभिषेकानंतर राजे शिवरायांनी समर्थांना अत्यंत आग्रहाने व सन्मानाने चाफळहून या गडावर आणले. तेव्हापासून या गडाला 'सज्जनगड' म्हटले जाऊ लागले. हा काळ १६५०चा होता. याच गडावर राजे शिवरायांनी एक महिना वास्तव्य केले होते. तेव्हा समर्थांचा निकटचा सहवास त्यांना लाभला होता. ते वर्ष १६७९चे होते. इतर वेळी गाठी-भेटी जरी झाल्या तरी, हे सान्निध्य वेगळे होते.



## ऋषींची तपोभूमी

या गडाला प्राचीन इतिहास आहे. ही आश्वलायन ऋषींची तपोभूमी होती. तेथे ऋषींनी तप केल्यामुळे ही भूमी पावन झाली. वेदकाळापासून याला परंपरा आहे. आश्वलायन ऋषींचे तप चालले असताना, त्यांचा तपोभंग करण्यासाठी इंद्राने उर्वशीला येथे पाठविले. परंतु, आश्वलायन ऋषींनी आपल्या तपोबलाने उर्वशीला, "तू मोडून पडशील", असा शाप दिला. त्यानुसार उर्वशी नदी म्हणून वाहू लागली. तीच येथील 'उरमोडी' नदी होय ! येथे दुर्गादेवी ही आंग्लाई मातेच्या रूपाने राहिली आहे. त्यामुळेही या परिसराला तीर्थमाहात्म्य प्राप्त झाले आहे. येथे मारुतीरायाचेही वास्तव्य होते. ते स्थान म्हणजे श्रीधर कुटीसमोरील मारुतीराया होय !

अनेक संत-महात्म्ये येथे येत होते व येत असतात. श्री समर्थ रामदासांचे येथील वास्तव्य १६५० ते १६८२ या काळात होते. श्री. प. प. श्रीधरस्वामीसारख्या ब्रह्मनिष्ठांचे तप व त्यांची सेवा येथे झाली होती. या गडाचे नाव 'आश्वलायन गड', 'अस्वलगड', 'परळीचा किल्ला' व नंतर 'सज्जनगड' असे होत गेले. अशा या पावन सज्जनगडावर संतचरणरज सर्वत्र बिलगलेले आहेत.

२१ एप्रिल १७०० रोजी साताराचा किल्ला औरंगजेबाने घेतला. त्यानंतर पुढे सज्जनगडाला वेढा दिला. समर्थशिष्या आक्काबाईंनी सहा महिने हा किल्ला निकराने लढविला. परंतु, पुढे लढा देणे अशक्य पाहिल्यावर समर्थसमाधी, मारुती-रामाच्या मूर्ती आत ठेवून चिर बंद केली आणि दक्षिणेकडून गड उतरून त्या सडे पारगावला गेल्या. समर्थांचे गुप्तरूपाने कार्य केले. औरंगजेब गेल्यावर गड पुन्हा मराठ्यांच्या ताब्यात आला. तेव्हा समर्थभक्त आक्काबाई गडावर आल्या. त्या

थकल्या होत्या. समाधीची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी समर्थांचे ज्येष्ठ बंधू गंगाधरपंत यांच्या नातवांना बोलावून आणले व गडाची व्यवस्था त्यांच्याकडे सोपविली. पुढे श्री समर्थ रामदासस्वामी संस्थान स्थापन होऊन कार्य सुरू झाले. कालपरत्वे पुढे अनेक घटना घडल्या. समाधी व गड यांची दुरावस्था झाली. ती दूर करण्यासाठी श्री. प. प. श्रीधरस्वामींनी श्री समर्थ सेवा मंडळाची १९५० साली स्थापना केली आणि या मंडळाद्वारे जीर्णोद्धार व नवीन सुविधा निर्माण करून देवाची, समाधीची व भक्तांचीही सेवा केली.

## गडावरील स्थाने

(१) **शेजघर :** शिवाजीराजे यांनी समर्थांच्या निवासासाठी हे घर बांधून दिले होते. तेथे सध्याचे संस्थानचे स्वयंपाकघर व समर्थांच्या वापरातील वस्तू आहेत. तेथेच समर्थांनी देह सोडला. रामपंचायतन या शेजगृहात होते. रामपंचायतनातील राममूर्तीकडे पाहतच समर्थांनी इ. स. १६८२मध्ये माघ वद्य नवमीला देह सोडला.

(२) **समाधी :** आज जिथे समाधी दिसते तिथे एक बऱ्यापैकी खोलगट भाग होता. त्या ठिकाणी राजे संभाजी यांनी समाधी बांधली. त्यावर पुढील काळात श्री रामाचे मंदिर उभे केले. त्यानंतर पुढे सभामंडप बांधण्यात आला. मंदिराच्या कडेला (दोन बाजूंना) ओवऱ्या आहेत.

(३) जिथे आज अशोक वृक्षांची बाग आहे तिथे तळे होते. ते बुजवून बाग करण्यात आली आहे.

(४) भांडारगृह निर्माण करण्यात आले असून तिथे सकाळ-संध्याकाळ जेवणाची व्यवस्था केली जाते.

(५) जवळच वेणाबाई/आक्काबाईचे मठ आहेत. तिथे एक हॉल आहे.

(६) **खांबांचे तळे :** येथे खांबांचे तळे असून यातील पाणी स्नानासाठी उपयोगात आणले जाते. ही सोय समर्थ सेवा मंडळाने उपलब्ध करून दिली आहे.

(७) **सोनाळे तळे (पवन चक्की)** : पिण्याच्या पाण्याची सोय येथून करण्यात आली आहे.

(८) **श्रीधरकुटी :** श्रीधरस्वामींनी दुमजली इमारत बांधलेली असून त्यात श्रीधरस्वामींनी वास्तव्य केले होते. येथे गोशाळाही आहे. या ठिकाणी श्रीधरस्वामींनी तपाचरणही केले होते.

(९) **मारुतीचे मंदिर :** श्रीधरकुटीसमोर मारुतीचे स्थान आहे. गडावरचे हे अत्यंत प्राचीन व आद्य स्थान म्हणावे लागेल.

(१०) **आंग्लाई मंदिर :** गडाच्या एका कडेला आंग्लाईदेवीचे मंदिर आहे. दुर्गादेवी आंग्लाईदेवीच्या रूपाने येथे वास्तव्यास आहे.

(११) **भक्तनिवास :** समर्थ सेवा मंडळाने प्रशस्त इमारत बांधली असून भक्तांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था येथे केली जाते.

लोकमान्य टिळक स्मृती प्रवेशद्वाराच्या पुढे कमान आहे. गडाच्या मागच्या बाजूस टोकावर धाब्याचा मारुती आहे. तसेच, कल्याणस्वामींनी गुरुआज्ञेने उडी टाकून छाटी आणली त्या स्मृतीची जागा आहे. सध्या अनेक सुविधांनी गड सुसज्ज आहे. समर्थांच्या स्मृती तेवत राहिल्याच्या अनेक जागा येथे आहेत.

या सर्व योजनांत श्री समर्थ सेवा मंडळाचे योगदान लक्षणीय आहे. श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा, महाशिवरात्र, तसेच दासनवमी हे उत्सव येथे मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. त्याचप्रमाणे संस्कार व सुट्टीतील विविध वर्गांद्वारे प्रबोधनाचे कार्य चालते. पत्रद्वारा दासबोधाचे उपक्रम होऊन जनमानसात लोकजागृतीचे कार्य केले जाते.

हा गड संदेश देत असतो :-

**देव मस्तकी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा॥**

आणि

**चढते वाढते वाढवावे। भजन देवाचे॥**

❑❑❑

(श्री क्षेत्र अक्कलकोट)

# श्री स्वामी समर्थांच्या वास्तव्याने पुनीत झालेली 'प्रज्ञापुरी'

- प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे

**स्म**रणसातत्य जिथे असते तिथे नित्यजागृती असते. या दोन्ही अवस्था जिथे एकवटतात तिथे दत्तविभूतींचे अस्तित्व असते. श्री स्वामी समर्थांची प्रचीती त्यांच्या नामोच्चारातच आहे. श्री दत्तपरंपरेत श्री स्वामी समर्थांचा




**अक्कलकोट येथील २१ वर्षांच्या वास्तव्यात श्री स्वामी समर्थ ज्या वडाखाली बसत, तसेच त्यांनी ज्या वडाखाली निजानंदी आपला देह विलीन केला तो हा वटवृक्ष. तेथील श्रीमूर्तीचे मंदिर हे 'श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान' म्हणून ओळखले जाते.**

**दत्तात्रेयाचे चौथे अवतार म्हणून गणले गेलेले श्री स्वामी समर्थ हे अक्कलकोट येथे वास्तव्याला आले आणि पुढे तेथील वटवृक्षाखाली त्यांनी निजानंदी देह ठेवला, म्हणून त्यांना 'अक्कलकोटस्वामी' हे नामाभिधान मिळाले. अक्कलकोटला 'प्रज्ञापुरी' असेही म्हणतात. प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज यांनी तर त्यांना 'बुद्धिग्रामीचे मुनीश्वरू' असे संबोधिले आहे. प्रज्ञापुरी ही अध्यात्म नगरी जशी आहे, तशी ती आता उद्योग नगरी म्हणूनही उदयास येत आहे. श्री स्वामी समर्थ साखर कारखाना ही औद्योगिक विकासाची सहज खूण आहे, असे म्हटले तरी चालेल.**

अवतार चौथा मानला जातो. ही परंपरा पुढीलप्रमाणे आहे :- (१) वेद आणि पुराणकाळात अत्रि ऋषी आणि अनुसूया यांचा पुत्र म्हणजे दत्त होय ! (२) पूर्वेकडील पीठापूर प्रांतात १४व्या शतकात ज्यांचा जन्म झाला ते श्रीपाद श्रीवल्लभ. त्यांनी अवतार संपविताना ''पुन्हा भेटेन'', असे अभिवचन भक्तांना दिले. त्याप्रमाणे तेच पुढे प्रगट झाले. (३) कारंजा नगर येथे 'प्रगट झालेले' ते नृसिंह सरस्वती होत. त्यांचा कालावधी शके १४०८ ते १४५८ असा आहे. त्यांनीच गाणगापूर येथे श्रीपाद श्रीवल्लभांच्या पादुकांची स्थापना केली. ते कर्दली वनात गुप्त झाले. (४) कर्दली वनातून पुन्हा ३०० वर्षांनी जे प्रगटले ते स्वामी समर्थ होत. म्हणून ऐतिहासिकदृष्ट्या तिसरे व अध्यात्म परंपरेने चौथे अशी ही 'परंपरा' आहे.

## प्रगट काळ ४० वर्षे

श्री स्वामी समर्थांचा महाराष्ट्रातील, विशेषतः सोलापूर जिल्ह्यातील प्रगट काळ ४० वर्षे आहे. **''शके सतराशे**

साठात। स्वामी जगदुद्धारार्थ। प्रगटले मंगळवेढ्यात। साक्षात् दत्त अवतारे'', अशी 'स्वामीलीलामृत' या पोथीत ओवी आहे. मंगळवेढा, मोहोळ, सोलापूर येथे येऊन पुढे ते शके १७७९मध्ये अक्कलकोट येथे आले. अक्कलकोट येथे त्यांनी २१ वर्षे वास्तव्य केले. पंचक्रोशीतही भ्रमंती केली. वडाच्या झाडाखालीच शके १८००मध्ये त्यांनी आपला देह निजानंदी विलीन केला. अर्थात, त्यानंतर व अजूनही भक्तांना त्यांचे दृष्टांत होतात. ''भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी'', या त्यांच्या अभिवचनाचा अनुभव येतो. **'श्री स्वामी समर्थ'** हे षडाक्षरी नाम वा **'श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ'** हे पंचदशाक्षरी नाम हे सिद्ध असून त्या नामाच्या स्मरणानेच ते कृपावंत होऊन भक्तांना पालवीत आहेत. त्यांचे 'नाम' हाच 'गुरुमंत्र' झाला आहे. त्यांनीच अवतारसमाप्तीच्या वेळी गीतेतील **''अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम्''**, या श्लोकाचा उच्चार करून ''मला अनन्यभावे जे शरण येतील त्यांचा मी योगक्षेम चालवीन'', असे अभिवचन दिले होते. श्री स्वामी समर्थांचे अनेक चमत्कार होतात. अर्थात, ते व्यक्तिगत स्वरूपाचे असून भक्ती वाढावी, श्रद्धा दृढ व्हावी, उपासना चालावी यासाठी आहेत, हे वेगळे सांगायला नकोच.

## प्रज्ञापुरीतील विविध मठ

प्रज्ञापुरीत स्वामी समर्थांचे पाच प्रमुख मठ आहेत. (१) **श्री वटवृक्षस्वामीमहाराज मठ.** येथेच वटवृक्ष असून त्याखालीच श्री स्वामी समर्थांनी अवतारसमाप्ती केली. ज्योतिबा पांडे या सेवकाने हा मठ बांधला. या मठात अभिषेकपूजा, काकडारती ते शेजारती अशी उपासना, नैवेद्य, भजन, तसेच वार्षिक पुण्यतिथीनिमित्त 'धर्मसंकीर्तन सप्ताह' इत्यादींचे आयोजन केले जाते. (२) **श्री स्वामी समर्थ समाधी मठ.** हा बुधवार पेठेत आहे. तेथे स्वामीभक्त चोळप्पा राहात होते. स्वामी समर्थांनी अवतारसमाप्तीपूर्वीच हा मठ बांधविला. तेथे गणपती, देवी, खंडोबा यांची प्रतिष्ठापना केली. ''समाधिस्थानी राहून आम्ही दर्शन देऊ'', असेही त्यांनी भक्तांना सांगितले. (३) **जोशीबुवांचा मठ.** चिंतोपंत टोळ हे कारभारी तेथे राहात असत. ते स्वामीभक्त होते. स्वामी समर्थ तेथे पाटावर उभे राहिले. त्या पाटावर त्यांची पावले उमटली आहेत. तो पाट या मठात अजूनही आहे. (४) **श्री राजेराय मठ.** श्री राजेराय हे हैद्राबाद संस्थानातील जहागीरदार होते. ते खूप आजारी होते. पण श्री स्वामी समर्थ यांच्या कृपेने ते बरे झाले. त्यांनी हा मठ बांधला आहे. (५) 'गुरुमंदिर' म्हणून ओळखला जाणारा **बाळप्पा मठ** होय! स्वामी समर्थांचे उपासक बाळप्पा यांना स्वामींनी पादुका, दंड, रुद्राक्षमाळा दिल्या होत्या. त्या इथे आहेत. हा मठ शिष्यपरंपरेतील असून अलीकडे त्यावर श्री श्रीकांतमहाराज राजीमवाले हे पीठाधीश म्हणून आहेत.

श्री स्वामी समर्थ अक्कलकोट येथे आले तेव्हा प्रथम ज्या खंडोबाच्या मंदिरात आले (एस. टी. स्टँडजवळील) तेथेही आता पादुकांची स्थापना करण्यात आली आहे. 'गुरुमंदिर' मठात वास्तव्याला असलेले श्री गजानन महाराज यांची समाधी शिवपुरी येथे आहे. श्री शैल मल्लिकार्जुन मंदिर (एस. टी. स्टँडसमोर), तसेच हक्कमाचा मारुती (स्वामी सेवक बाळप्पा यांची तपोभूमी), शेख नुरुद्दिन दर्गा येथे स्वामी समर्थ बसत असत. ही सर्व स्थळेही पाहण्याजोगी आहेत.

## श्री स्वामींचा 'उपदेश'

श्री स्वामी समर्थांनी वेगवेगळ्या प्रसंगी अनेक भक्तांना उपदेश केला आहे. संन्याशांना उपदेश करण्याच्या निमित्ताने त्यांनी सांगितले की, **''संतवचनांवर पूर्ण**



**श्री स्वामी समर्थांचे शिष्य श्री बाळप्पा महाराज यांचा हा मठ 'गुरुमंदिर' म्हणून ओळखला जातो. तेथे श्री गजानन महाराज यांचे वास्तव्य होते. या मठात श्री स्वामी समर्थांचा दंड, रुद्राक्ष माळा, पादुका आहेत.**

विश्वास ठेवा ! सर्व संतांचा आदर करा ! अहंकाराचा त्याग करा ! अखंड नामस्मरण करा ! प्रारब्धानुसार जे आपल्या वाट्याला येते त्याचा ईश्वरेच्छा म्हणून स्वीकार करा ! प्राणिमात्रात भगवंताचा वास आहे; त्यामुळे कुणालाही कायिक, वाचिक, मानसिक दुःख देऊ नका. ईश्वरावर प्रेम करा !'' श्री स्वामींनी अनेकांचे गर्वहरण केले. अनेकांना संकटांत सहाय्य करून संकटांचे निरसन केले. सर्वांभूती दया दाखविली. त्यांनी निरूपिलेले तत्त्वज्ञान थोडक्यात पुढीलप्रमाणे : ''कर्तव्य हीच साधना होय ! संयम हा सर्वांत महत्त्वाचा गुण होय ! स्वावलंबन हाच साधनेचा मूलमंत्र होय ! सिद्धीबद्दल निरिच्छता असावी. सहजसमाधी म्हणजे भगवंताशी अखंड अनुसंधान जोडणे होय !'' त्यांची काही बोधवचनेही लक्षात ठेवण्याजोगी व अनुसरण करण्यायोग्य अशी आहेत. ''शेत पिकवावे, मग खावे.'' म्हणजे नामस्मरण करावे व ईश्वरदर्शन प्राप्त करून


श्री स्वामी समर्थ यांचे मूळ अस्सल छायाचित्र सन १८७५

घ्यावे. प्रयत्नाशिवाय ईश्वरकृपा कशी प्राप्त होणार ? म्हणून साधना केलीच पाहिजे. ''अक्कल से खुदा पहचानो'' किंवा ''स्वामी तो अक्कलकोट में है.'' म्हणजेच नामबुद्धीचा उपयोग करून सद्गुरूंना शरण जावे. ''भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी'', या अभिवचनात 'स्मरताक्षणी' ही गोष्ट अध्याहृत आहे. ''भजावे एकास देवास.'' म्हणजेच देवावर दृढ श्रद्धा असावी. उपासनेत द्वैतभाव ठेवू नये. दैवत बदलू नये. मनात शंका धरू नये. ''मुक्तीसाठी नामस्मरण करणे हाच सोपा असा मार्ग आहे.'' नाम हाच देव आहे. नामामुळेच साधकाच्या इच्छा पूर्ण होतात. परधन व परस्त्री यांचा संग धरू नये. शरणागत होऊन नामस्मरण करावे. अशी स्पष्टता त्यांनी केली आहे.

## 'तीर्थक्षेत्र' विकसित व्हावे...

महाराष्ट्र शासनाने अक्कलकोटला 'तीर्थक्षेत्र' म्हणून घोषित करून पर्यटनस्थळाचा दर्जा देऊ केला आहे. त्यामुळे लवकरात लवकर विविध सोयी-सवलती मिळून गावाचा सर्वांगीण विकास होईल, असे म्हणायला हरकत नाही. 'श्री वटवृक्षस्वामीमहाराज देवस्थान'ने 'भक्तनिवास' बांधला असून तेथे उत्तम सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. अन्नछत्र मंडळाने भक्तांच्या चहा, उपहार, प्रसाद-भोजन यांची उत्तम सोय केली आहे. त्यांनीही भक्तांच्या सोयीसाठी 'निवास संकुल' उभे केले आहे. हळूहळू लघुउद्योगांनाही प्रोत्साहन दिले जात असून अलीकडे श्री स्वामी समर्थ साखर कारखाना उभा केला गेला आहे. शाळा - कॉलेज - तांत्रिक शिक्षणसंस्था यांमुळे शैक्षणिक क्षेत्रात गाव प्रगत झाले आहे. अधूनमधून विविध सांस्कृतिक कार्यक्रमही होतात. नवा राजवाडा येथील शस्त्रागार पाहण्याजोगे आहे. नगर परिषदेनेही ग्रामविकासाला हातभार लावला आहे. 'अध्यात्म नगरी ते औद्योगिक नगरी' असा अक्कलकोट तथा प्रज्ञापुरी या गावाचा विकास होत असून भाविकजन, शासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी यांच्या सहयोगातून या नगरीचे वैभव दाही दिशांनी वर्धिष्णू होवो, हीच मनोकामना.

'प्रज्ञा', अे-७४, आसरा सोसायटी,
होटगी रस्ता, सोलापूर.

# शेगावक्षेत्रीचे गजानन महाराज

(पूर्वार्ध)

- डॉ. सौ. सुनन्दा खेरडे, अमरावती.

## स्वर्णभू भारतवर्ष

विश्वकवी रविंद्रनाथ टागोर म्हणत - "भारत म्हणजे महामानवांचा सागर ! महान पुण्यतीर्थ !"

अर्थात - **"क्या लड़ता मूरख बंदे । यह तेरी खामखयाली है । है पेड़ की जड़ तो एक वही । हर मजहब इक इक डाल है ॥"**

स्वामी रामतीर्थ म्हणत - "प्रत्येक देशात, प्रांतात, जातीत ईश्वराने 'संदेशवाहक' पाठविला आहे, जसे मुस्लिम - महंमद पैगंबर, पारशी - अवेस्ता, हिंदू-गौतम बुद्ध, ख्रिस्त - एंजिल !" आचार्य विनोबा भावे म्हणत - "आम्हाला विश्वमानव व्हायचे आहे. त्यासाठी विश्वसंस्कृती ओळखली पाहिजे." "भिन्न ध्येये व प्रकृतींचे लोक एकत्र मिसळले व त्या मिश्रणातूनच कोणतीही महान संस्कृती निर्मिली गेली; असा मिसर, बाबिलोन, चीन, हिंदुस्थान, ग्रीस, रोम यांचा इतिहास आहे." - हे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे मत.



**शेगावचे गजानन महाराज समाधिस्थ झाले तेव्हा, माझा भाऊ गेला म्हणून साईबाबांनी शोक व्यक्त केला. यावरून गजानन महाराज व साईबाबांचा आंतरिक संबंध व्यक्त होतो. अक्कलकोटचे स्वामी समर्थ, शेगावचे गजानन महाराज व शिरडीचे साईबाबा या त्रिमूर्तीला दत्तभक्तांमध्ये विशेष स्थान आहे.**

अर्थात - "आर्य व आर्येतर जातींनी मिळून जी संस्कृती उत्पन्न केली, तीच भारताची पायाभूत संस्कृती बनली." (दिनकर) तसेच राष्ट्रसंत म्हणतात - **"हर देश में तू हर भेष में तू । तेरे नाम अनेक तू एक ही है । तेरी रंगभूमि यह विश्वभरा, हर खेल में मेल में तू ही तू है ॥"**

महात्मा फुलेंचे स्वप्न होते - "या भूगोलावर सर्व स्त्री-पुरुषांनी आपले एक कुटुंब समजून सत्य वर्तनाने वागावे. एकाच घरात बौद्ध पत्नी, ख्रिस्त नवरा व सार्वजनिक सत्यधर्मी कन्या-पुत्रांनी प्रेमाने नांदावे." धर्ममूर्ती रामकृष्ण परमहंस म्हणत - "ब्राह्मण-सुफी-ख्रिश्चन योग्यांच्या अनुभवांत फार फरक नाही, हे सप्रयोग सिद्ध झाले आहे." अर्थात - **साधू दिसती वेगळाले। परि ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळूनि एकचि झाले। देहातीत वस्तू ॥** अन् 'गीताई'ची साक्षही अशीच -

**"सारे जगातले भेद, तेव्हा कालवले जसे । देहात देव देवाच्या, देखिले तेथ अर्जुने ॥"** (विश्वरूपदर्शन)

वरील विवेचनाचा अर्थ - **"जात न पूछो साधु की । पूछ लीजिए ग्यान मोल करो तलवार का । पड़ी रहन दो म्यान" ॥**

## ज्ञानी-योग्यांची विदर्भभूमी

ऋग्वेदात विदर्भऋषी-ऋषीपत्नींनी रचलेली सूक्ते

आहेत. आर्यसंस्कृतीचे दक्षिणेतील प्रचारक अगस्ती ऋषी व त्यांची पत्नी, म्हणजे विदर्भाधिपतीची कन्या लोपामुद्रा या दोघांच्या ऋचा ऋग्वेदाच्या प्रथम मंडलात १६५ ते १९१पर्यंत आलेल्या आहेत. बृहदारण्यक उपनिषदात विदर्भस्थ कौंडण्य ऋषींचा प्रामुख्याने उल्लेख आहे. अर्थात - विदर्भ ही महातपस्वी, कल्पक, बुद्धिमान व संघटक अशा श्रेष्ठ ऋषीमुनींची कर्मभूमी व तपोभूमी आहे, असे इतिहास सांगतो. शिवाय, रघुकुळाचा जो मूळ पुरुष सगरनृपती, त्याची पत्नी कोशिनी ही विदर्भराजाची कन्या होती, असा रामायणात उल्लेख आहे. तसेच, अयोध्येच्या रघुकुळातील अज राजपुत्राची पत्नी कोमलांगी इंदुमती ही कौंडण्यपूरच्या भोजराजाची कन्या होती. तिचा पुत्र राजा दशरथ व पौत्र श्री रामचंद्र.

## सारस्वती जन्मभू

असा गौरवशाली उल्लेख बालरामायणात कवी राजशेखराने विदर्भभूमीचाच केलेला आहे. विदर्भ म्हणजे भारतवर्षाचे 'नाभिकमल'. या नाभीतील काळी कस्तुरी मृगाच्या पहिल्या-वहिल्या सरींनी आपला आल्हादक दरवळ वाऱ्यावर उधळायची. दाही दिशा धुंद करून टाकायची. तिच्या अणूअणूतून पिवळेधमक सोने अंकुरायचे. इंचाइंचावर हिरवेकंच पाचू बहरायचे. शरद - हेमंताच्या चंदेरी स्पर्शाने चांदीचा सडा व्हायचा. तजेलदार मोत्यांचे घोस डोलू लागायचे.

## स्वयंहि तीर्थानि पुनन्ती सन्ता

विदर्भाच्या या गंधवती काळ्या कस्तुरीतूनच संतमूर्ती प्रज्ञाचक्षु बालांध गुलाबराव महाराज, गाडगेबाबा, तुकडोजीबाबा व गजाननबाबा यांचा पिंड वर आला आणि या भूमातेच्याच अंकी त्यांनी त्याला अखेरचा विसावा दिला. त्या महात्म्यांच्या देहाचे चंदन कणाकणामध्ये मिसळून या वऱ्हाडची काळीशार माती पंढरीचा पावन बुक्का बनली. या वैराग्यमूर्तींच्या पदचिन्हांनी विदर्भाचे वैभव फुलारले. त्यांच्या मंगल समाधीपुढे भारतातील करोडो भाविकमस्तके श्रद्धावनत झाली. तीर्थांना पुण्यपावन करणारे हे महासंत ! त्यांच्या चिरनिवासाने माधान, शेंडगाव, गुरुकुंज, यावली व शेगाव ही भावतीर्थे निर्माण झाली. त्यांच्या स्मृतिसोहळ्याने तेथे यात्रेचा महिमा बहरला. ''नभामाजी तारांगणे तैसे'' लोक झुबंड उडवू लागले. **''गणगण गणात बोते''** व **''देवकीनंदन गोपाला''**सारखे उच्च स्वरांतील सामूहिक गजर आकाशात दुमदुमले. दिंड्या-पताका, राहुट्या-प्रदर्शने, प्रार्थना-पूजा आणि जयंत्या-पुण्यतिथ्यांनी ही 'श्री क्षेत्रे' फुलून आली.... असा हा संतमहिमा !

## शेगावीचे संत गजानन महाराज

**''जयाचेनि बोले धर्म जिये । दिठी वाक्‌सिद्धीते विये ॥''** या वचनाप्रमाणे वेदविद्या, योगशास्त्र इत्यादी पूर्वजन्मीच्या सर्व स्मृतींसह श्री गजानन महाराजांचा जन्म इ. स. १८५७-५८च्या सुमारास बुलढाणा जिल्ह्यातील थळ या खेडेगावी एका गरीब कुणबी कुटुंबात, शेतकरी भवानीराम साबळे व शाऊबाई या माता-पित्याकडे झाला. त्यांचे हे पहिले अपत्य ! दुसरी बहीण, वाल्हंबा ऊर्फ नूराबाई ! ते दुसऱ्यांच्या जागेत झोपडी बांधून राहत असत. विक्षिप्त अवलियासारखे वागणे पाहून (गजानन) गणाला लोक वेडा समजत. ते वस्त्र नेसत नसत. सतत धावत.... पान्हेरी, कोहळा बाजार इत्यादी गावी धावत जात असत. स्वत:ला 'अरे गणा' म्हणत. **''पाहोन त्या नैवेद्यासि महाराज बोलले आपणासि । गणप्या अघोऱ्या न करी अनमान ।''** किंवा **''गणाले भूक लागली रे''**, **''गण्या झाडावर चढ''**, असे बोलत. तपोवनचे मारोती पाटील त्यांना 'बालसाधूचा अवतार' समजत. आंघोळ घालून जेऊ घालत. नवीन उमरेडी धोतर, सदरा व जरीकाठी उपरणे नेसायला देत. त्या नवीन कपड्यांसह थळकडे जाताना सर्व कपड्यांच्या चिंध्या करून गणा झाडाला लटकवून देई.

## गणाच्या बाललीला

१) गणाचे जेवण म्हणजे सर्व पदार्थांचा एकत्र काला. ते कधी टोपलीभर भाकऱ्या, तर कधी शेरशेर मिरच्या खात



असत व घागरभर पाणी पीत असत. २) एकदा भर उन्हाळ्यात मुद्दाम गणाकडे पाणी काढून मागणाऱ्या स्त्रियांसाठी गणाने दिवसभर पाणी काढून नाल्यात ओतले. शेवटी कोरडा नाला वाहू लागला. स्त्रियांनी क्षमा मागेपर्यंत गणा पाणी काढीत होता. ३) किसन गवळ्याने पान्हेरी गावाच्या शेतात वस्त्रहीन गणाला पाहिले. बैल बुजाडला व पळाला. म्हणून संतापाच्या भरात गणाला बैलाच्या जागी जुंपले. नांगरता नांगरता गणा म्हणतो - ''जा, तुझ्या घरी, गोठ्यात बैल कुटार खात आहे.'' गोठ्याला बाहेरून कुलूप होते व बैल गोठ्यात ! किल्ली खिशात ! व दुसरे आश्चर्य, शेत संपूर्ण नांगरलेले - हे पाहून गणाची क्षमा मागण्याची पाळी किसनवर आली. ४) गणाविरुद्ध येणाऱ्या तक्रारींमुळे त्याला प्रयागसिंग ठाकुराच्या खोलीत बंद करून बाहेरून कुलूप लावत. दार कुलूप-बंद असे व गणा बाहेर येई. असाच एकदा १७/१८ वर्षांच्या वयात चिमटाधारी साधूंना चिलीम भरून देतादेता त्यालाही चिलमीची सवय लागली व त्यांच्यासह दरमजल करीत तो अक्कलकोटला साधूंसह पोचला. तेथे स्वामी नृसिंह सरस्वती यांच्याकडे २ वर्षेपर्यंत उपदेश घेतला. सिद्धपुरुष नृसिंह सरस्वती हे ३०० वर्षे (१५१८ ते १८३८) समाधीस्थितीत राहिले होते. दहाही प्राण ब्रह्मरंध्रात नेऊन व त्यांचा निरोध करून 'असंप्रज्ञात' समाधी त्यांनी घेतली होती. त्यामुळे देहावर वारूळ, नखे लांब, डोळे तेजस्वी व कांती लखलखीत झाली. अनेक शक्ती - सिद्धी प्राप्त झाल्या. त्यानंतर नृसिंह भान, चंचल भारती आदि नावे घेऊन त्यांनी भारतभ्रमण केले व १८५६मध्ये अक्कलकोटला गेले. त्यानंतर गजानन (गणा) मोहोळ, मंगळवेढे वगैरे गावे करून अक्कलकोटला स्वामींकडे आले व त्यांच्याकडे सिद्धी-साधना केली. शेगावचे केशवराव पाठक व यशवंतदेव मामलेदार यांनी नाशिकच्या संतासह गजानन महाराजांना अक्कलकोटला पाहिले होते.

## शेगावी प्रगट दिन

अक्कलकोटहून नाशिक, बग्गी, अकोट येथे थांबत, गजानन महाराज शेगावला इ. स. १८८८च्या माघ वद्य सप्तमीस आले व स्थायिक झाले. अकोटच्या नरसिंग महाराजांची समाधी २८/१/१८८८ला झाली व माघ वद्य सप्तमी, अर्थात २३ फेब्रुवारी १८८८ला पूर्वजन्मीच्या सर्व स्मृतींसह, वेदविद्या, योगशास्त्रपरायण सिद्धकोटीचे संत गजानन महाराज शेगावी प्रगट झाले व दिव्य सामर्थ्याने अनेक अतर्क्य लीला-चमत्कार करून व असंख्य जीवांचा उद्धार करून भाद्रपद, शुद्ध पंचमी, शके १८३२, अर्थात ८/९/१९१० रोजी ऋषिपंचमीस शेगावच्याच पुण्यभूमीत समाधिस्थ झाले. नागलकर गुरुजी शेगावी महाराजांसन्निध मठातच असत. त्यांनी केलेल्या टिपणांवरून व रामचंद्र पाटलांच्या आग्रहावरून दासगणू महाराजांनी गजानन महाराजांचे २१ अध्यायी चरित्र 'गजानन विजय' या पोथीरूपाने लिहिले आहे. त्यात आलेल्या चमत्कार-लीलांचा हितोपदेश व त्यांच्या वाणीचा, कृतीचा अन्वयार्थ लावणे, ही भक्तभाविकांसाठी आनंदाची पर्वणीच ठरते. ही एकवीस मोदकांची, एकवीस दुर्वांची प्रसादरूपी पूजा संत दासगणूंनी गजाननचरणी अर्पण केली आहे. त्यातील प्रत्येक अध्याय गूढार्थाने व हितोपदेशाने समाजप्रबोधन करणारा आहे. तो कसा ते पाहणे भाविकांसाठी हितकारक ठरेल.

## 'गजानन विजय'चा अन्वयार्थ

**अध्याय १ -** उष्ट्या पत्रावळीतील दोन घास घेणे व पाणी शुद्ध करून पिणे. यात अनासक्ती, ''अन्न हे पूर्णब्रह्म'' व ''पाणी सर्वत्र पवित्र'', तसेच नीरक्षीर विवेक बुद्धी गजानन महाराजांनी व्यक्त केली आहे.

**अध्याय २ -** अ) बंकटलालास संतदर्शन - तळमळ लागली तेव्हा त्याची झुणका-भाकर घेऊन त्याला शांत केले. शबरीची बोरे खाऊन रामप्रभूंनी भक्ताची मनोकामना पूर्ण केली त्याप्रमाणे !

ब) टाकळीकरांचा द्वाड घोडा शांत केला - गजानन महाराजांना योगसिद्धी प्राप्त होती. त्यामुळे सुरसा मगरीच्या मुखातून सूक्ष्मरूपे बाहेर पडणाऱ्या जितेंद्रिय हनुमंताप्रमाणे

महाराज द्वाड घोड्याच्या चारही पायांमध्ये निवांत सुखरूप झोपले व घोडा शांत झाला.

क) पितांबराने संतआज्ञेने सुकलेल्या नाल्यातून तुंबा भरून आणला. पंचमहाभूतांवर स्वामित्व त्यांनी प्राप्त केले होते. **"देव करी तरी काय न होई । दगडाचिये नई तरीजेल ।। फुटतिल पाय चालतील भिंती । मेरू मषक येती समतुका ।।"** हे पाहून पितांबर गजानन महाराजांचा अनन्य भक्त झाला.

ड) षोडशोपचारे पूजा, हार, सुगंधी तेले व मिष्टांन्ने भक्त देत असत व दिंड्या, ढोल, टाळांसह हरिनामाचा गजर करीत असत. पण खाणे, ओकणे व पुन्हा तेच खाणे आणि "खा, खा अघोऱ्या", असे वारंवार म्हणणे, पाण्यात-झऱ्यात झोपणे, धावणे, चिलीम ओढणे हे गजानन महाराजांना आवडे ! तसेच निरिच्छवृत्ती, अनासक्ती हे तत्त्व ते व्यक्त करीत असत.

**अध्याय ३ -** अ) गांजाचा नवस करणाऱ्या भक्ताची कानउघाडणी. म्हणजे **"पापी दोषी जैसे तैसे । लाविले कासे आपुलिया ।।"**

ब) मरणपंथी लागलेला जानराव भक्त तीर्थ-अंगाऱ्याने वाचला - 'मृत्यू'विषयी गजानन महाराजांचे उपदेशामृत याच प्रसंगीचे आहे. तारक संजीवनी अशी 'संतकृपा' - हा साक्षात्कार घडला.

क) विठोबा पेढे खाऊन मातला. त्याने महाराजांना झोपेतून उठविले; तेव्हा त्याला काठीने बदडले व पळवून लावले - **"विनाशायच दुष्कृताम", "नाठाळाचे काठी हाणू माथा"**, हा हितोपदेश यातून स्पष्ट होतो.

**अध्याय ४ -** अ) जानकीराम सोनाराने अक्षय तृतीयेला चिलीम पेटवण्यास विस्तव दिला नाही. उलट 'वेडा, पागल, अभद्र सोंग' अशा गजानन महाराजांना शिव्या दिल्या व आव्हान दिले, "योगबळावर चिलीम पेटवून दाखव !" तेव्हा साध्या काडीसमोर चिलीम धरताच ती पेटली व इकडे जानकीरामच्या घरच्या जेवणात अळ्या-कीडे पडले. त्यामुळे पंगत पात्रांवरून उठून गेली. तेव्हा सोनाराने गयावया करून महाराजांची क्षमा मागितली व जेवण पूर्ववत झाले. योगसिद्धीचा विलक्षण अनुभव !

ब) अघोरपंथी, अन्न, जल वर्ज करणाऱ्या माधवला 'वाघाच्या रूपाने' दर्शन दिले व 'मनुष्यवाणीने उपदेश' दिला. डोक्यावर हात ठेऊन समाधिस्थितीत 'अमरपद' दिले. (**"आपणासारिखे करिती तात्काळ"**)

**अध्याय ५ -** अ) पिंपळगावच्या अरण्यात गजानन महाराज शिवमंदिरात ध्यानस्थ ! अखंड समाधिस्थितीत ! भक्तांनी मिरवणूक काढली. तेथे बंकटलाल आला. दोन गावचे भक्त गुरुबंधू झाले. आनंदोत्सव झाला. दोन गावे जुळली. (योगसिद्धी)

ब) अडगावचा भास्कर, शेतातील विहीर कोरडी म्हणून, घागरीने पाणी आणून पिके जगवीत होता. गजानन महाराजांना तहान लागली, म्हणून पाणी मागताच तो रागाने बोलला, "असेल सिद्धी तर माझ्या विहिरीला पाण्याने भरून दे !" तेव्हा क्षीरशयनी विष्णूची व गंगेची प्रार्थना करून महाराजांनी विहिरीला पाण्याचे झरे आणले. "विहिरीचे पाणी सरणार नाही; शेती कर !" असा आशीर्वादही दिला. (पंचमहाभूतांवर विजय)

**अध्याय ६ -** अ) एकदा बंकटलालच्या शेतात आंब्याखाली मक्याची कणसे खायला भक्त जमले. कणसे भाजताना झाडावरचे मधमाशांचे मोहळ उठले. सर्व भक्त पळाले. बंकट मात्र तेथेच ! मधमाशा चावून महाराजांचा देह सुजला. भक्त येऊन म्हणाले, "सोनाराकडून काटे काढू." त्यावेळी प्राणायाम-योगसिद्धीने देहातील काटे महाराजांनीच काढले व बंकटला म्हणाले, "उमज घे. गाव खाण्यासाठी जमतो." (संतशक्ती - साक्षात्कार)

ब) नरसिंह महाराज (अकोट) गुरुतुल्य आदरभावाने गजानन महाराजांना मानत. दोघे शिवर गावी सूर्यभक्त वज्रभूषणाकडे गेले. सूर्यरूपाने त्याला महाराजांनी दर्शन दिले. तेव्हा त्याने चरणी अर्घ्य अर्पून भक्तिभावे वंदन केले.

पारस-नागझरी-मलकापूर, नांदुरा, आजगावच्या भक्तमेळ्यांत भ्रमंती व शेगावी चातुर्मासात मारुतीपारावर चातुर्मास्य उत्सव. (अंतर्ज्ञानाने भक्ताची कामनापूर्ती, आर्तदानी)

**अध्याय ७** - शेगावी पाटील मारुतीभक्त ! महादजीचे कडताजी व कुकाजी हे दोन पुत्र. कडताजीची ६ मुले गजानन महाराजांना म्हणत - ''वेडपट जोगड्या, कुस्ती खेळतोस ?'' ते एकदा गजानन महाराजांना उसांनी मारून मारून थकले. तेव्हा गजानन महाराजांनी त्या उसांचा रस काढून त्यांना पिण्यास दिला. पाटीलपुत्र नम्र झाले. ''निपुत्रिक खंडूला पुत्र होईल. आम्ररसाचे ब्राह्मणभोजन दरवर्षी शेगावी घालावे'', असा आशीष दिला. (**''दया क्षमा शांति । तेथे देवाची वसती ॥''**) **''परोपकार पुण्याय । पापाय परपीडनम् ।''** असा संदेश या लीलेतून मिळतो.

**अध्याय ८** - अ) अरेरावी करणाऱ्या देशमुखांनी महाराला फितवले. खंडू पाटलाशी त्याने अपशब्द बोलल्यामुळे पाटलाने काठी मारली. त्याचा हात मोडल्यामुळे हातकडीची पाळी आली. गजानन महाराजांचा धावा केला तेव्हा संकट टळले. (भक्ततारक)

ब) तेलंगी विद्वान ब्राह्मण अपमंत्र म्हणून पोथ्या सांगत असता त्यांना शुद्ध मंत्र सांगून महाराज म्हणाले,''पोटभरू वृत्ती सोडा !'' ब्राह्मण खजिल झाले. पायी लोटांगण घालून कीर्ति गात गेले. (**''तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वते दुभे । मग सकल शास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ॥''**) किंवा - **''जयाचेनि बोले धर्म जिये''** - ही अनुभूती दिली.

क) गोसाव्यांचा तांडा कृष्णाजीच्या मळ्यात उतरला. शिरापुरीवर यथेच्छ ताव मारणे व शाब्दिक पुराणाची वटवट करणे. गजानन महाराजांना 'वेडा, बावळा, सोंगाड्या' म्हणून खिजविणे, हे गोसाव्यांचे काम. तेव्हा गजानन महाराजांनी पेटत्या चिलमीची ठिणगी पलंगावर पाडली व जळत्या पलंगावर गोसाव्यांना बसवू लागले. ते घाबरताच महाराज म्हणाले, **''नैनं छिन्दन्ति शस्त्राणि । नैनं दहति पावकाः**, हे खरे ना ? मग कसले भय ?'' मृत्यूविषयी प्रमाणासह निरूपणही महाराजांनी यावेळी विस्तारपूर्वक केले.

**अध्याय ९** - बाळापूरचे बाळकृष्ण व पुतळाबाई समर्थ रामदासस्वामी यांचे भक्त. दासनवमीला सज्जनगडावर नित्यनेमाने वारी करीत. पण वार्धक्यामुळे अशक्य. तेव्हा स्वप्नदृष्टांत देऊन गजानन महाराज, ''घरीच दासनवमी करा'', म्हणाले व रात्री १२ला **''जय जय रघुवीर समर्थ''** अशा घोषासह दर्शन देण्यास आले. (संत आर्तदानी आर्ता ते देखे, कृपाकरी) दामाजीसाठी, महार झाला पंढरीनाथ, त्याप्रमाणे.

**अध्याय १०** - अ) महार कास्तकार महाराजांचा भक्त. शेतात पीक उभे होते. महाराजांनी सांगितले, ''रात्रीच पीक (कडबा) कापून आण !'' पत्नी संतापली. महाराजांना 'जोगडा, ढोंगी, मेढ' अशा शिव्या-शापांसह म्हणाली, ''सावकाराला काय देऊ ? घरात काय खाऊ ?'' सकाळी महापूर - वादळात सर्वांची पिके बुडाली. फक्त याचीच वाचली. (भविष्यद्रष्टा व भक्ततारक संत.) महार कास्तकाराने गावकऱ्यांना सहाय्य केले.

ब) अग्रवाल मारवाड्याची भाकड, मारकी गाय माजलेली होती. दोरखंड बांधून जखडवून महाराजांकडे आणली. महाराज म्हणाले, ''सोडा तिला''.... आणि कासवीच्या स्नेहदृष्टीने पाहताच गाय गरीब झाली. महाराजांचे पाय चाटू लागली. (अर्थात - संतसंगमहिमा. संताचे वैभव -**''वचनं मधुरं वदनं मधुरं स्मरणं मधुरं चरणं मधुरं''** अशा योगतेजाने युक्त महाराजांमुळे पुढे गाईची वंशवेल वाढली.

क) कारंजालाडच्या लक्ष्मण घुडे यास पोटाची व्यथा होती. ती महाराजांमुळे नष्ट झाल्यावर घरी नेऊन त्यांना आपली संपत्ती त्याने गर्वाने दाखविली. ''बुद्धी कुवासना''- महाराज म्हणाले, ''संपत्तीच सांभाळ !'' **(उदारस्य तृण वित्तं- विरक्तस्य तृणं धरा ॥)**

ड) अमरावतीत गजानन महाराज गणेशअप्पा लिंगायत याच्यासह धुर्धर वकील, शं. ग. खापर्डे व आत्माराम भिकाजीकडे दर्शनास गेले. त्यावेळी गरीब अप्पाची पत्नी दर्शनास आसुसली. तेव्हा, ''तुझ्याकडे घेऊन चल'' म्हणून महाराजांनी अप्पाच्या पत्नीसही दर्शन दिले. (मूल भुकेले, तहानेले आहे, हे आई जाणते. त्याप्रमाणे आर्त भक्ताचा धावा संत जाणतात. **''संत आर्तांते वाडोवाडी गिवसती । आर्त देखे अन् कृपा करी.''**)

इ) नोकरी सोडून भक्त बाळाभाऊ महाराजांच्या सेवेसाठी शेगावी आसोलकरांच्या मळ्यात राहिला. सत्संगओढ अनावर होती. इतरांना वाटले, प्रसादाला चटावला, असे भास्करने बोलून दाखवताच छत्रीने व काठीने महाराजांनी त्याला खूप मारले आणि मुखांने **''गण गण गणात बोते''** म्हणू लागले. बाळाभाऊच्या अंगावर माराचे वळ नव्हते. उलट दिव्य कांती दिसू लागली. गण (ईश्वर) गणात (जनांत) गणि (बधावा) बो ते (बा तुवा), असा सहजसुलभ मंत्र महाराजांच्या मुखात तेव्हापासूनच राहू लागला व बाळाभाऊ (लोह) महाराजांच्या (परिसाच्या) स्पर्शाने उद्धरला. **''तप्तं तप्तं पुनरपिपुन: कांतवर्णं सुवर्णं। घृष्टं घृष्टं पुनरपिपुन: चंदनं चारुगंधम् ।।''**

**अध्याय ११ -** अ) बाळकृष्ण व पुतळाबाईकडे बाळाभाऊ, पितांबर, भास्कर वगैरे भक्तांसह दासनवमीसाठी महाराज गेले असता भास्करला कुत्रे चावले. महाराज म्हणाले, ''याचे आयुष्य संपले. तथापि, मी २ महिन्यांत याचे दोष घालवतो'' व त्याच्यासह त्रंबकेश्वरी व नाशिकला काळाराम - ज्योतिर्लिंगदर्शनास गेले आणि हनुमान जयंतीला, जेथे बाळाभाऊस शेगावी छत्रीकाठीने मारले होते, तेथेच समाधी घेण्याची आज्ञा केली. पंचवटी (पिंपळ, उंबर, आंबा, आवळा, वड) असलेल्या द्वारकेश्वराजवळ पद्मासन घालून नासिकाग्री दृष्टी व गजाननचिंतनात, 'हरिओम्' अशा भक्तांच्या गजरात भास्कर समाधिस्थ झाला. **''पापी दोषी जैसे तैसे । लाविले कासे आपुलिया ।''** याचे वैकुंठी प्रयाण झाले, जन्ममरण संपले - महाराज.

ब) तेरवीला कावळे खूप जमले. तेव्हा महाराज म्हणाले - ''त्यांना प्रसाद द्या ! पुन्हा येणार नाहीत.'' खरेच झाले ! कावळे पुन्हा आले नाहीत. अर्थात - **''वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळवीती ।''**

क) गणु गोवारी विहिरीत बारूद भरून सुरूंग लावण्यासाठी उतरला. अचानक सुरूंगाचा स्फोट झाला. त्याची गजाननभक्ती अतिशय. कळवळून धावा केला. कपारीत धोंड्याआड लपून वाचला. **''प्रभुमुद्रिका मेलि मुख मांही । जलधि लांघिगयो अचरज नाही ।।''** अथवा - **''पांचालीच्या करुणावचने कळवळुनी आले । प्रल्हादाच्या भावार्थासी स्तंभी गुरगुरले ।।''** तसे.

**अध्याय १२ -** अ) महाराजांचा खास शिष्य पितांबर होता. अंगावर फाटक्या चिंध्या; पण संतसेवेत मग्न ! चिंध्या पांघरून भक्तीचे सोने विकणारा ! सुदामाप्रमाणे अत्यंत दरिद्री ! परंतु इतर भक्त त्याच्यावर जळू लागले. महाराजांनी कोंडोली गावी जाण्यांची आज्ञा व आशीष देताच, पाण्याविना मासळी किंवा आईविना मुलासारखा तळमळू लागला. पण कोंडोलीला गेला. तेथे आंब्याच्या झाडावर बसला. तेथील लोकांनी विचारले, ''कोण ?'' ''मी गजाननभक्त'', म्हणाला. ''त्या गजाननबाबांनी वाळलेले झाड हिरवे केले. तू त्या झाडाला पाने लाव; तरच भक्त मानू'' - लोकांचे आव्हान. आव्हान स्वीकारून अखंड नामस्मरण व गजानन महाराजांचा धावा केला. झाडाला पाने फुटली. आर्त भक्तीला अशक्य काही नाही. हनुमंतासारखी सेवाभक्ती तेथे त्याने केल्यामुळे पितांबराची समाधीही तेथेच बांधली गेली.

ब) श्रीमंत बच्चुलाल (अकोलानिवासी) यांनी महाराजांची षोडशोपचारे पूजा करून, दशांगुली मुद्रिका, जरतारी पितांबर आणि केशरकस्तुरीयुक्त पक्वान्न भोजन

देऊन नम्रपणे प्रार्थना केली, ''राममंदिर बांधावेसे वाटते - कृपा व्हावी.'' महाराजांनी आशीर्वाद दिले. वैभवाला श्रद्धेचे सौजन्य व लीनता हवी.

क) शेगावी हक्काची जागा मिळविण्यासाठी महाराजांनी भक्तांना सुचविले. सरकारी १ एकर जागा मिळाली. शिवाय एकनिष्ठ भक्तमंडळींनी वर्गणी जमा केली. संकल्पसिद्धी.

**अध्याय १३ -** अ) महाराज नेहमी बसत तीच जागा देवळासाठी व समाधीसाठी योजिली. नम्रतेने, विश्वासाने हरि पाटील व भक्तांनी देऊळ उभारले. महाराजांच्या योगसामर्थ्यामुळे भक्तांनी संकल्पाची पूर्तता केली.


ब) सौंदडचा (मेहकरचा) गंगाभारती रक्तपितीने (महारोग) दुःखित होता. शेगावी गेल्यावर महाराजांचे दर्शनही त्याला कुणी घेऊ देई ना. तो गोड आवाजात भजने म्हणत असे. तेव्हा स्वतः महाराज त्याच्याकडे आले. त्याला लाथाडले, त्याच्यावर थुंकले. तोच प्रसाद समजून त्याने अंगाला चोळला. त्याला गुण आला. त्यामुळे शेगावीच सर्व कुटुंब घेऊन आला व एकतारीवर गोड भजने गाऊन महाराजांना प्रसन्नता देऊ लागला. याप्रमाणे या संताची सर्व काया शुद्ध सत्वगुणी, अष्टमहासिद्धीयुक्त व योगसिद्ध होती, हे अनुभवास आले. नतंर गंगाभारतीला त्यांनी मलकापुरी पाठविले.

क) झामसिंग या मलकापूरच्या भक्ताने मुंडगावला चतुर्दशीचा महाप्रसाद करावयाचे विचारले. तेव्हा महाराज म्हणाले, ''चतुर्दशीला नको, पौर्णिमा ठीक राहील.'' त्याने ऐकले नाही व मुसळधार पावसामुळे अन्नाची नासाडी झाली. यावरून संताला आगामी संकटाची चाहूल लागत असते, हे दिसून येते. भविष्यदृष्टी होती. पण संतवचनावर श्रद्धा न ठेवल्यामुळे झामसिंगचे नुकसान झाले.

ड) पुंडलीक हा गजाननभक्त, उकर्डा कुणब्याचा पुत्र होता. तो शेगावची वारी कधीही चुकवीत नसे. एकदा खूप ज्वरातसुद्धा तो महाराजांच्या दर्शनाच्या ओढीने शेगावी आला. महाराजांनी प्रसन्नतेने त्याच्या अंगावरून कृपाळू हात फिरविला. त्याला खूप बरे वाटले. **''सज्जनस्य हृदयं नवनीतं । यद्वदन्ति कवयस्तदलीकं । अन्यदेह विलसत् परितापात् । सज्जनो द्रवति नो नवनीतम् ।।''**

म्हणूनच म्हणतात - **''संत दरस को जाइए । तज माया-अभिमान । एक एक पग डालिए । कोटी यज्ञ समान ।।''** त्यामुळेच भक्त पुंडलीक वारी चुकवीत नव्हता. म्हणून त्याला अलभ्य लाभ झाला.

□□□

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
नवीन प्रकाशन
वाचताना शिरडीत असल्याचा भास
निर्माण करणारी व
क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी
**श्री साईंच्या प्रत्यक्ष सान्निध्यातील**
दादासाहेब खापर्डे यांची
**शिरडी रोजनिशी**



पृष्ठे : १५२

मूल्य : रु. १५ केवळ



श्री क्षेत्र माधानचे

# प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज

- प्रा. अजित कुलकर्णी



**आ**पल्या भारतभूमीचे वैशिष्ट्य असे आहे की, येथे भगवंताच्या अनेक विभूती अवतरित झाल्या आहेत. या मानवी विभूती म्हणजे, अनेक प्रकारच्या लोकोत्तर कार्यांनी सबंध जगाला भूषण वाटावे अथवा विश्वाचे जणू अलंकारच झाले आहेत. समर्थ रामदासांच्या शब्दांत म्हणता येईल, ''**हे तो देणे ईश्वराचे ।**'' अशा दिव्य परंपरेतील लोकोत्तर व्यक्तिमत्त्व म्हणजे विदर्भातील 'श्री गुलाबराव महाराज' हे एक होत !

महाराष्ट्रातील अमरावतीजवळ (४०-४५ कि. मी. अंतरावर) एलिचपूर या तालुक्यातील माधान हे एक खेडेगाव. या ठिकाणी कुणबी लोकांची वस्ती आहे. त्या ठिकाणी राणोजीराव मोहोड हे राहत होते. कुणबी समाजाचे असूनही ईश्वरनिष्ठ घराणे होते.

**कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक ।**
**तयाचा हरिख वाटे देवा ॥**
**गीता भागवत करिती श्रवण ।**
**अखंड चिंतन विठोबाचे ॥**

या न्यायाने पू. गुलाबराव महाराजांचा जन्म या कुळात झाला.

राणोजीरावांना गोंदुजी नावाचा पुत्र होता. त्याचा विवाह टाकळी गावाच्या पाटलाच्या कन्येबरोबर झाला. तिचे नाव आलोकाबाई होय ! धर्म व कर्मनिष्ठ परिवार होता. भगवद्भक्तीने कुटुंब संपन्न होते. यथावकाश या दांपत्याच्या पोटी दिनांक २१ जुलै १८८१ रोजी, सौ. आलोकाबाईच्या माहेरी, म्हणजे लोणी-टाकळी येथे, आषाढ शुद्ध दशमीला एका तेजस्वी पुत्राचा जन्म झाला. त्याचे नाव प. पू. गुलाबराव महाराज होय !

''**शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ॥**''

तसेच, राणोजीरावांना भगवान शंकरांनी दिलेला आशीर्वाद सुफल झाला.

हे तेजस्वी बालक माता-पित्यांना गुलाबपुष्पाप्रमाणे वाटल्यामुळे, त्याचे नाव 'गुलाब' असे ठेवण्यात आले. दिवस उत्तम जात होते. परंतु, आठव्या महिन्यात विचित्र घटना घडली. या महिन्यात बाळ गुलाबाचे डोळे आले. घरच्या लोकांनी झाडपाल्याचा औषधोपचार डोळ्यावर केला; पण त्यामुळे डोळे गेले. बाळाचे चर्मचक्षु गेले; पण प्रज्ञाचक्षु मात्र उघडले, असे घडले. बाळ गुलाब जगदृष्ट्या अंधत्वाच्या खाईत लोटला गेला. प्रज्ञाचक्षुने या बाळ गुलाबाची जीवनयात्रा सुरू झाली.

## पू. गुलाबराव महाराजांचे बालपण

**गुलाबराव महाराजांचा अफाट व्यासंग- विद्वत्ता आणि अवाढव्य ग्रंथसंपदा पाहता ते बालअंध होते, हे सांगूनही खरे वाटत नाही. त्यांचे चर्मचक्षु बालपणी गेले; पण त्यांना ईश्वरीकृपेने प्रज्ञाचक्षुचे वरदान लाभलेले होते. ते स्वत:ला संत ज्ञानेश्वरकन्या समजत होते. त्यांना मधुराद्वैताचार्य म्हणून गौरविले जाते.**

प्रारंभीचा काळ माधान गावात गेला. या प्रज्ञाचक्षुच्या आधारे या बाळाला नाद, ध्वनी, स्पंदनांच्या हालचालीवर गोष्टी अचूक कळत असत. परंतु, दुसरे दुर्दैव्य आड आले. १८८५ साली बाळ गुलाब मातृसुखाला पारखा



झाला. त्यावेळी त्यांचे वय अवघे ३-४ वर्षांचे होते. सौ. आलोकाबाईंना देवाज्ञा झाल्यावर वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत बाळ गुलाबाचे संगोपन आजोळच्या लोकांनी केले.

अंधत्व असून सर्व गोष्टींचे ज्ञान व ओळख पाहून सर्वजण अचंबित होत असत. आजीबरोबर टाकळीला कीर्तन-प्रवचनास जात असत. त्यांचे मनन-चिंतन ते करीत असत. त्यांची प्रज्ञाशक्ती, बुद्धी अत्यंत सूक्ष्म व तरल असल्याने सर्व विषयांचे ज्ञान (आकलन) चट्कन होत असे. एकदा ऐकलं की ते चांगलंच पाठ होत असे. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत बाळ गुलाब टाकळी येथे होता.

पुढे ते माधानला घरी आले. श्री. रामराव देशपांडेगुरुजींकडून प्रथम अनुग्रह प्राप्त झाला. त्यांच्याकडून उत्तम संस्कृत शिकून घेतले. प्रज्ञाशक्ती विकसित होत होती. वेद, उपनिषद, ब्रह्मसूत्र वाचून घ्यावीत. त्यांवर मनन-चिंतन करावे. येणाऱ्यास मार्गदर्शन करावे. अधिकारपरत्वे चर्चा करावी. याबरोबर बायबल, कुराणादि इतर धर्मग्रंथ वाचून घ्यावेत, त्यावर चर्चा करावी. योगक्रियाही कराव्यात. जीवनाला योग्य दिशा व वळण मिळत होते. या प्रकांड चिंतनातून मराठी सारस्वतात भर पडू लागली, साहित्य निर्माण होऊ लागले.

**परिमलाची धाव भ्रमर ओढी प्रमाणे**

त्यांच्याकडे अनेकांचे जाणे-येणे सुरू झाले.

## पू. गुलाबराव महाराजांच्या वैवाहिक जीवनास प्रारंभ

पू. महाराजांची कीर्ति पसरत होती. अशा वेळी सन १८९३ साली श्री. सीतारामजी भुयार यांची कन्या मनकर्णिका हिजबरोबर पू. गुलाबराव महाराजांचा विवाह संपन्न झाला. त्यावेळी पू. महाराज अकरा वर्षांचे होते व सौ. मनकर्णिका या सात वर्षांच्या होत्या.

पू. गूलाबराव महाराजांना नेहमी वाटत असे की, स्त्रियांनी शिकावे. अभ्यास करावा. सौ. मनकर्णिकाबाईंसाठी शिक्षणाची सुविधा निर्माण केली. त्यावेळी अतोनात त्रास झाला; पण सर्वांवर त्यांनी मात केली. स्वतः महाराज पत्नीला वेद-वेदांत, उपनिषद, योगविद्येचे शिक्षण देत असत. दोघंही संसार व अध्यात्माच्या प्रांगणात एकविचारी होते. स्त्रियांबद्दल त्यांच्या मनात पूजनीय भाव होता. एकदा पू. गुलाबराव महाराजांनी पत्नीला पत्रातून असे म्हटले की,

**प्रिये तू नव्हेस स्त्री वा पुरुष**
**सच्चिदानंद स्वयं प्रकाश ।**
**अविद्येने भुलोनि तयास**
**स्त्री पुरुषत्व तुज वाटे ।।**
**स्त्री पुरुष देहासी नाम**
**त्याहूनि वेगळा आत्माराम ।**
**तो नव्हे काम निष्काम**
**कर्मीकर्ता वेगळा जो ।।**
**पती पुत्र गोत्र बंधु**
**हे अवघेचि स्वार्थ साधू ।**
**त्याचा सोडुनिया संबंध**
**चित्ती मुकुंद आठवी ।।**

त्यावर सौ. मनकर्णिकाबाईंनी उत्तर दिले की, "मनुष्याने वेदविहित आज्ञेप्रमाणे वागावे. जीव जोपर्यंत स्त्री-पुरुष या मानवी देहात आहेत, तोपर्यंत उपाधिभेदाने वा बुद्धीनेच राहणे उचित आहे."

यावरून एक लक्षात येईल, व्यवहार हा सदैव द्वैताधिष्ठितच असतो, तर आध्यात्मिक चिंतन सदैव अद्वैताधिष्ठितच असते, याची जाणीव ठेवावी. याने जीवन यशस्वी होऊ शकते. पती-पत्नी सदैव ईशसेवेतच असावेत.

सन १८९७ साली पू. गुलाबराव महाराजांचे पितृछत्र हरपले. परंतु महाराज शांत होते. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

**तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे ।**
**मनचि सारस्वते दुभे ।**